श्रीदासराम ग्रंथमाला : पुष्प २१

विश्वगुरू श्रीसमर्थ सद्‌गुरू श्रीगुरूलिंगजंगमस्वामीमहाराजांनी
श्रीदासराममहाराजांना श्रुत केलेली

# श्रीगुरुलिंगगीता

( निवडक ५५ पदे भावार्थासह )

ॐ

• प्रकाशक •
श्री चंद्रशेखर रामराय केळकर

आवृत्ति पहिली    सांगली    इ.स. २०१०

श्रीदासराम ग्रंथमाला - पुष्प- २१
विश्वगुरु श्री समर्थ सद्गुरु श्रीगुरुलिंगजंगमस्वामीमहाराजांनी
श्रीदासराममहाराजांना श्रुत केलेली
**श्रीगुरुलिंगगीता**
( निवडक ५५ पदे भावार्थासह )
Shree Gurulinga Geeta

**प्रकाशक** : श्री. चंद्रशेखर रामराय केळकर
घ.नं. ८२७, श्रीराम निकेतन, श्रीबापूरावजी केळकर वाडा,
सिटी हायस्कूल मागे, गांवभाग, सांगली-४१६ ४१६
दूरध्वनी-(०२३३) २३३२४६३

**प्रथम आवृत्ति** : इ.स. २०१०

**प्रकाशन दिन** : मार्गशीर्ष वद्य पंचमी, शके १९३२
शनिवार, दिनांक २५/१२/२०१०
श्रीक्षेत्र देवनिंबरगी

**समर्पण दिन** : मार्गशीर्ष वद्य षष्ठी शके १९३२
रविवार दिनांक २६/१२/२०१०
श्रीक्षेत्र चिमड

© सर्व हक्क प्रकाशकाचे स्वाधीन

**मुद्रक** : श्री. अनिल लोखंडे
श्रीदासराम ऑफसेट, सांगली.
दूरध्वनी-(०२३३) २३२२७२९
**मुखपृष्ठ व अक्षरजुळणी** : श्री. अनंत अजित लोखंडे

**प्रसाद मूल्य** : रु. ३५/- मात्र

## प्रकाशकाचे मनोगत

श्रीदेवनिंबरगी हे गांव कर्नाटकात आहे. तेथे भगवान् श्रीसद्गुरु श्रीनारायणराव भाऊसाहेबमहाराज निंबरगीकर ऊर्फ विश्वगुरु श्रीगुरुलिंगजंगम स्वामीमहाराज यांचे वास्तव्य होते. त्यांचे पट्ट शिष्य श्रीसद्गुरु रघुनाथप्रिय साधुमहाराज हे होत. त्यांची समाधि श्रीक्षेत्र चिमड येथे श्रीगुरुलिंगजंगम स्वामींनी श्रीसद्गुरु श्रीरामभाऊमहाराज यरगट्टीकर ऊर्फ श्रीचिमडमहाराज यांचेकडून स्थापन करून घेतली आणि त्यांचा रथोत्सव करण्यास सांगितले आणि या रथोत्सवासाठी श्रीगुरुलिंगजंगममहाराज आपल्या निर्वाणापर्यंत स्वतः जातीने हजर रहात असत. त्यांचे इ.स. १८८५ मधील निर्वाणानंतर त्यांचे परमाधिकारसंपन्न नातू श्रीसद्गुरु श्रीनागाप्पाण्णामहाराज हे चिमडच्या रथोत्सवास जात असत. इ.स. १९३९ साली श्रीनागाप्पाण्णामहाराज रथोत्सवास गेले असता माझे पितृदेव ती.प.पू. श्री रामराय गोविंद केळकर तथा श्रीदासराममहाराज हेही चिमडला रथोत्सवास गेले होते. भगवान् श्रीसद्गुरु श्रीतात्यासाहेबमहाराज कोटणीस यांच्या आशीर्वादानुसार श्रीदासराममहाराज हे बालपणापासून कीर्तन करीत असत. या रथोत्सवाच्या काळात श्रीदासराममहाराजांचे कीर्तन आयोजित करण्यात आले होते. हे कीर्तन ऐकून श्रीनागाप्पाण्णामहाराज फार खूष झाले व ते श्रीदासराममहाराजांना 'प्रल्हाद' म्हणाले. या प्रल्हादाने श्रीनागाप्पाण्णामहाराजांना काही पारमार्थिक शंका विचारल्या. त्यांचे निरसन केल्यानंतर श्रीनागाप्पाण्णामहाराज म्हणाले, 'श्रीगुरुलिंगजंगममहाराजच तुम्हाला बोध करतील'. नातवाचे शब्द आजोबांनी खरे केले. निर्याणानंतरही श्रीगुरुलिंगजंगममहाराज हे सांगलीस श्रीदासराममहाराजांचे घरी साक्षात् प्रगट झाले. आणि त्यांनी 'येनू इल्ल दानू' हे कानडी पद चालीत म्हटले. श्रीदासराम-महाराजांनी त्यांचे पायावर मस्तक ठेवले. श्रीगुरुलिंगजंगममहाराज अदृश्य झाले. हे ऐकलेले पद श्रीदासराममहाराजांना लगेच पाठ झाले. श्रीदासराममहाराजांना कानडी येत नसल्याने ते पद त्यांनी ऐकलेल्या उच्चारानुसार देवनागरी लिपीत तिथि, शके, वेळ इत्यादीसह लिहून ठेवले. हे पद म्हणजे श्रीदासराममहाराजांना

'श्रीगुरुलिंगगीता' श्रुत होण्याचा प्रारंभ होय.

इ.स. १९३९ नंतर श्रीगुरुलिंगजंगममहाराजांनी कधी स्वतः प्रगट होऊन, तर कधी सिद्धानंद असा अवतार घेऊन श्रीदासराममहाराजांना कानडी पदे श्रुत केली. इ. स. १९४८ पर्यंत ही कानडी पदे एकूण ६५ झाली. ती श्रीदासराममहाराज दररोज पठण करीत असत.

इ.स. १९४८ साली श्रीगुरुलिंगजंगममहाराजांचे पणतू म्हणजे श्रीनागाप्पाण्णामहाराजांचे अधिकारसंपन्न चिरंजीव श्रीगुरुसिद्दप्पामहाराज हे सांगलीस श्रीदासराममहाराजांचे घरी आले होते. त्यावेळी श्रीगुरुलिंगजंगम-महाराज आपणास कानडी पदे श्रुत करीत आहेत असे सांगून श्रीदासराम महाराजांनी ती पदे त्यांना म्हणून दाखविली. श्रीगुरुसिद्दप्पामहाराजांना खूप आनंद झाला. श्रीगुरुसिद्दप्पामहाराजांचे एक कानडी पद बरेच दिवस झाले, पूर्ण होत नव्हते.ते यावेळी श्रीदासराममहाराजांच्या इच्छेनुसार पुरे झाले. ते पद म्हणजे 'नमो नमो गुरुलिंगजंगमेशा' हे पद होय. सदरचे हे पद या गुरुलिंग-गीतेच्या प्रारंभी घालण्यास श्रीदासराममहाराजांनी श्रीगुरुसिद्दप्पामहाराजांना परवानगी देणेबाबत विनंती केली. ती त्यांनी मान्य केली आणि याप्रमाणे हे पद पहिले धरून गुरुलिंगगीतेची ६६ पदे झाली.

श्रीदासराममहाराज श्रीगुरुसिद्दप्पामहाराजांना म्हणाले,"आता यापुढे कानडी पदे मला श्रुत होणार नाहीत." तेव्हा श्रीगुरुसिद्दप्पामहाराज म्हणाले, "रामभाऊ, असे का म्हणता? या पुढेही तुम्हाला पदे श्रुत होणार नाहीत कशावरून?" या वचनाच्या गर्भित अर्थाप्रमाणे यानंतरही श्रीदासराममहाराजांना संस्कृत, इंग्रजी, मराठी व कानडी या भाषातून पदे श्रुत होत गेली. यांमध्ये इंग्रजी पदे ३ आहेत. ही सारी एकूण पदे २२८ झाली. यांतील कानडी पदे श्रीदासराममहाराजांना जशी ऐकू आली तशी त्यांनी ती देवनागरी लिपीत लिहून ठेवली होती.

श्रीगुरुलिंगगीतेच्या पहिल्या ६६ कानडी पदांचा मराठीत अर्थ श्रीगुरुलिंगजंगममहाराजांनी श्रीदासराममहाराजांच्या अंतर्यामी स्फुरविला. तो त्यानी लिहून काढला. या अर्थाच्या भावार्थासह ही ६६ पदे इ.स. १९५३ मध्ये



ह.भ.प.श्रीवासुदेवराव जोशी यांनी मुद्रित स्वरूपात प्रकाशित केली. अनेक लोक ही ६६ पदे नित्य म्हणत असत.

इ.स. १९८५ साली आमच्या श्रीदासराममहाराजांचे एक भक्त श्री श्री. वि. सहस्रबुद्धे यांना प्रेरणा झाली की, ही एकूण २२८ पदे पुस्तक रूपाने प्रकाशित करावीत. श्रीदासराममहाराजांची अनुज्ञा घेऊन त्यांनी ती प्रकाशित केली. या ग्रंथात प्रकाशकाचे मनोगत व प्रस्तावना या दोन भागात श्रीगुरुलिंगगीतेचा संपूर्ण इतिहास, श्रीगुरुलिंगगीतेतील तत्त्वज्ञान, श्रीदासराम महाराजांचा पदे श्रुत होण्याचा अधिकार इ. भाग तपशिलाने आला आहे. हे सारे कानडी लिपीतील पुस्तकामध्ये स्वतंत्रपणे दिले आहे.

आमच्या श्रीदासराममहाराजांना या गुरुलिंगगीतेतील 'येनु इल्ल दान' हे पहिले पद १९३९ साली श्रुत झाले. ही पदे श्रुत व्हायला लागून या वर्षी ७१ वर्षे पूर्ण होतात. या श्रीगुरुलिंगगीतेतील ही कानडी पदे आतापर्यंत मराठी लिपीत छापलेली आहेत. ती कानडी लिपीत प्रकाशित करता आली तर ते कानडी जाणणाऱ्या माणसांच्या दृष्टीने सुवर्णाहून अधिक पिवळे होईल असे वाटल्याने तसा विचार मनात सुरू झाला. हा सारा विचार माझे बंधू व गुरुबंधू श्री.सूर्यकांतजी केळकर श्री.अनल केळकर, श्री.अनिलप्रभू केळकर यांचे जवळ बोलून दाखविला. तसेच प्रा. डॉ. के. वा आपटे, गुरुवर्य श्री. भ.रा.नाईक, त्यांचे जावई श्री.मुकुंद जेरे अशा अनेकांचे जवळ बोलून दाखविला. या साऱ्यांना तो विचार फार आवडला व तसे करायचे हे ठरले.

श्रीगुरुलिंगगीतेतील पहिल्या ६६ पदांनंतर जी अनेक पदे आहेत त्यातील तात्त्विक दृष्ट्या ५५ पदांचा अर्थ मराठीत कळत नाही. प्रकृतीशी तादात्म्य असणाऱ्या माझ्यासारख्या प्राकृताला ते कळणारेही नाही म्हणून तर श्रीमहाराजांनी कानडीतून बोध केला. ही ५५ पदे प्रा. डॉ. के. वा.आपटे यांनी निवडून दिली आहेत. ही ५५ पदे व त्यांचा मराठीत अर्थ मराठी लिपीत असे एक पुस्तक आणि पहिली ६६ पदे व नंतरची ५५ पदे अशी एकूण १२१ पदे व त्यांचा अर्थ कानडी लिपीत असे दुसरे पुस्तक अशी एकूण दोन पुस्तके प्रकाशित होत आहेत. या दोनही पुस्तकांत वर पद व त्याखाली त्याचा अर्थ

अशी योजना केली आहे. या दोनही पुस्तकांत अकारानुक्रमे सूची शेवटी दिली आहे.

पुढील ५५ पदांचा मराठीत अर्थ आमचे श्रीदासराममहाराजांच्या कृपेतील श्री. नारायण रघुनाथ देशपांडे व श्री. एस. के. कुलकर्णी यांनी करून दिला आहे. हे सगळे काम फारच छान झाले आहे. या एकूण संकल्पपूर्तीसाठी श्री. मुकुंद गजानन जेरे, सांगली, प्रा. डॉ. के. वा. आपटे, प्रा. नारायण के. आपटे, सांगली, प्रा. सौ. राजश्री चराटी, सांगली, श्रीसमर्थ सद्गुरु श्रीगणपतरावमहाराज कन्नूर यांचे पुतणे श्री. एस्. एस्. वैद्य सांगली, आमचा श्री. दीपक केळकर, श्री. कपिलदेव हडदरे, श्री. गणेश चव्हाण अशा अनेकांनी व आमचे घरातील सगळ्यानी या कामी आत्यंतिक परिश्रम घेतले आहेत. वरील सर्वांचा मी अत्यंत ऋणी आहे. वर म्हटले आहे की, श्रीगुरुलिंगजंगममहाराज श्रीदासराममहाराजांचे समोर प्रगट झाले त्यावेळी ते श्रीदासराममहाराजांना कसे दिसले, त्याचे वर्णन त्यांनी लिहून ठेवले होते. ते वर्णन ऐकल्यावर त्या वर्णनाबरहुकुम व त्यात पार्श्वभूमीची थोडी भर घालून श्रीगुरुलिंगजंगममहाराजांचे चित्र पुण्याचे सुप्रसिद्ध चित्रकार श्री. जि.भि. दीक्षित यांनी तयार केले. श्री. जिवाजीपंत दीक्षितांनी तर यात जीव ओतला आहे. त्या चित्राचे छायाचित्र येथे देण्यात आले आहे. श्रीगुरुलिंगगीतेचा ग्रंथ आपल्या करकमलात वागविणाऱ्या श्रीदासराममहाराजांचे छायाचित्रही देणेत आले आहे. तसेच या ग्रंथात जी अन्य छायाचित्रे घालण्यात आली आहेत, त्यांच्याविषयी थोडेसे सांगणे आवश्यक आहे. श्रीगुरुलिंगजंगम महाराजांच्या परंपरेत अनेक अनेक संत महात्मे होऊन गेले. त्यापैकी काही महात्म्यांची छायाचित्रे मुद्दाम येथे देण्यात आली आहेत.

प्रस्तुत श्रीगुरुलिंगगीतेच्या मराठी ५५ पदांच्या मुद्रणाचे काम आमच्या श्री.बाळासाहेब लोखंडे यांच्या 'श्रीदासराम ऑफसेट' या मुद्रणालयाने व त्यांच्या सहकाऱ्यानी फार चांगले केले आहे. या सर्वांचा मी आभारी आहे.

'सत्य संकल्पाचा दाता नारायण। सर्व करी पूर्ण मनोरथ' या श्रीजगद्गुरु तुकाराममहाराज यांच्या उक्तीप्रमाणे भगवान् श्रीसद्गुरु गुरुलिंगजंगममहाराज



यांनी हा प्रकाशन संकल्प सिद्धीस नेला आहे.

आता भगवान् श्रीसद्गुरु श्रीतात्यासाहेबमहाराज कोटणीस, माझे आजोबा ती. प. पू. श्रीमामामहाराज केळकर, माझे पितृदेव ती. प. पू. श्रीदासराममहाराज केळकर यांनी अशीच कृपादृष्टी आम्हा सर्वांचेवर ठेवून कृपाशीर्वाद द्यावा अशी त्यांचे चरणी शतशः प्रार्थना करतो.

**।। राजाधिराज श्रीसद्गुरुनाथमहाराज की जय ।।**

सांगली<br>दि. ३-११-२०१०<br>गुरुद्वादशी

श्री दादांचा कृपाभिलाषी<br>***चंद्रशेखर***<br>(चंद्रशेखर रामराय केळकर)

## ❖ श्रीदासराम ग्रंथमाला पुष्प यादी ❖

| पुस्तकाचे नांव | पुष्प क्रमांक | सन |
|---|---|---|
| चिमड संप्रदाय | १ | २००५ |
| श्रीरामदासस्वामी चरित्र | २ | २००६ |
| भजन तरंग | ३ | २००६ |
| हरिपाठ संकीर्तन | ४ | २००७ |
| श्रीदासराममहाराज नित्यपाठ चरित्र | ५ | २००७ |
| दासबोधातील तत्त्वज्ञान | ६ | २००७ |
| श्रीदासराममहाराजांचा वचनसंग्रह | ७ | २००८ |
| श्रीरघुनाथप्रिय साधुमहाराज चरित्र | ८ | २००९ |
| साधन संध्या | ९ | २००९ |
| अनंत अमृत स्मरण | १० | २००९ |
| श्रीगुरु महिमा | ११ | २००९ |
| श्रीज्ञानेश्वरी प्रसाद | १२ | २००९ |
| श्रीदासराम गाथा : पुरवणी | १३ | २००९ |
| श्रीदासराममहाराज आत्मचरित्र | १४ | २०१० |
| श्रीनारायणमहाराज यरगट्टीकर यांचे चरित्र | १५ | २०१० |
| श्रीदासराममहाराज : श्लोकरचना | १६ | २०१० |
| ज्ञानदेवकृत अनुभवामृत ओवी टीकेसहीत | १७ | २०१० |
| श्रीदासराममहाराज सहस्रनामस्तोत्रम् | १८ | २०१० |
| आत्माराम (श्रीदासराममहाराजकृत गद्य अर्थासह) | १९ | २०१० |
| श्रीगुरुलिंगगीता (कानडी लिपीत) | २० | २०१० |

## [ १ ]

नमो वरव कोड्डवाता । नमो नम्म सद्गुरुनाथा ।।१।।
शरणरु दासप्रेमी । नमो नमो नम्म स्वामी ।।२।।
निरंजन निर्विकारु । नमो गुरु देवदेवरु ।।३।।
शरणागतरु संरक्षकने । नमो नमो नामप्रियने ।।४।।

माझ्यावर अनुग्रह करून मला आशीर्वाद देणाऱ्या सद्गुरूंना नमस्कार असो. आमच्या सद्गुरुनाथांना नमस्कार असो ।।१।।
शरणागत दासावर प्रेम करणाऱ्या आमच्या स्वामींना नमस्कार असो ।।२।।
निरंजन आणि निर्विकार स्वरूप असलेल्या देवाधिदेव अशा सद्गुरूंना नमस्कार असो ।३।।
शरणागत जीवाचे रक्षण करणारे आणि ज्यांना नाम अत्यंत प्रिय आहे अशा सद्गुरूंना नमस्कार असो ।।४।।

## [ २ ]

ॐ नमो श्रीजगदाधारनु मित्रने । ॐ नमो श्रीरविप्रकाशने ।
अखिल विश्वात्मनु सूर्यने । ॐ नमो ।।१।।
श्रीसिद्धानंद भानुस्वरूपने । खेचरी मुद्रिदगोचर खगने ।
नमो नमो श्रीपुष्पवने । ॐ नमो ।।२।।
ॐ नमो हिरण्यगर्भने । ॐ नमो श्रीमरीची स्वरूपने ।
ॐ नमो श्रीपरमादित्यने । ॐ नमो ।।३।।
ॐ नमो श्रीआदिसवित्रने । ॐ नमो श्रीसत् चिदार्कने ।
ॐ नमो श्रीमहाभास्करने । ॐ नमो ।।४।।
इडापिंगळ जोड गुडिसिद प्रगटने । भर्ग सहस्र चक्रद यदा स्थितने ।
आत्मसविता सूर्यनारायणने । ॐ नमो ।।५।।



अखिल जगताचा आधार असणाऱ्या सूर्यास नमस्कार असो. सूर्यप्रकाशास नमस्कार असो. अखिल विश्वाचा आत्मा असणाऱ्या सूर्यास नमस्कार असो ।।१।।
सूर्यस्वरूपी सिद्धानंदांना नमस्कार असो. खेचरी मुद्रेस गोचर असलेल्या सूर्यास नमस्कार असो. श्रीसूर्यास नमस्कार असो. ।।२।।
हिरण्यगर्भाला नमस्कार असो. श्रीमरीचिस्वरूपी सूर्यास नमस्कार असो. श्रीपरमआदित्यास नमस्कार असो. ।।३।।
श्रीमूळसूर्यास नमस्कार असो. सत्चिद्रूपी आत्मसूर्यास नमस्कार असो. श्रीमहाभास्करास नमस्कार असो. ।।४।।
इडा आणि पिंगला यांची मिळवणी करून प्रकटलेल्या तसेच सहस्रार चक्रामध्ये स्थिर ज्योतीप्रमाणे असलेल्या आत्मसूर्यास, सूर्यनारायणास नमस्कार असो. ।।५।।

## [ ३ ]

संगमेश्वरन्न रामा पूजे माडिद ।
नाऊ नीऊ यल्लनु रामा धन्यन वागिद ।।१।।

जय देवा जय देवा रामा जय बोधा रामा ।
स्वयंभलिंग नोडिद रामा ॐ सोऽहं नामा ।।२।।

दोड्डु जन्म छलो ई रामा जीवन भ्यट्टेल्ला ।
श्रीगुरुकृपा करुणे रामा वंद वागिद बल्ला ।।३।।

आपददल्ली रामा लीनागिद्दा प्रल्हाद ।
निंद निनगे मुट्टितु रामा जीवनवानंद ।।४।।

संगमेश्वराची पूजा करून हे रामा, तुम्ही आम्ही सर्वजण धन्य झालो आहोत ।।१।।
देवाचा जयजयकार असो. बोधस्वरूप रामाचा जयजयकार असो. हे रामा, तुझ्या स्वयंभू आत्मस्वरूपी सोऽहं नामाचे दर्शन झाले ।।२।।

या जन्मामध्ये तुझी भेट घडून माझ्या उभ्या आयुष्याचे सार्थक झाले. हे रामा, श्रीगुरूने करुणा येऊन कृपा केली आहे. हे रामा, मी तुला वंदन करतो. ।।३।।

हे रामा, संकटकाळी हा प्रल्हाद तुला शरण येतो. त्यामुळे त्याला स्वतःजवळ असलेला जीवनानंद प्राप्त झाला आहे. ।।४।।

[४]

जय हर शंभो सांब सदाशिव । जय हर शंभो जय सांबा ।।१।।

शिव हर शंभो जय सांबा । हर हर शंभो जय सांबा ।।२।।

यन्न नी केडसिदी सांबा । यल्ल अल्ल नी शिव सांबा ।।३।।

भिदाभिद माडिदि सांबा । भुलवीगे मरुळा सांबा ।।४।।

हारिसिदि भवचक्रनु सांबा । त्रिगुणव कळकोळ्ळो सांबा ।।५।।

प्रल्हादेश्वर नी सांबा । रक्षिसिदी अदु जय सांबा ।।६।।

शंभु,सांब,सदाशिवाचा जयजयकार असो. हर, शंभूचा जयजयकार असो. सांबाचा जयजयकार असो. ।।१।।

अत्यंत मंगलकारक अशा शंभूचा, सांबाचा जयजयकार असो. हराचा, शंभूचा जयजयकार असो. सांबाचा जयजयकार असो. ।।२।।

हे सांबा, माझे सर्व काही तू ऐकतोस. हे शिवसांबा माझे सारसर्वस्व तूच आहेस. ।।३।।

हे द्वैत तूच निर्माण केले आहेस. असे द्वैत निर्माण करून तू आम्हास भुलविले आहेस. ।।४।।

हे सांबा, तूच आम्हाला भवचक्रातून सोडवितोस. हे सांबा, तूच आमच्यामध्ये असलेले त्रिगुण काढून घेतोस. ।।५।।

आमचे सदैव रक्षण करणाऱ्या, प्रल्हादेश्वर सांबाचा जयजयकार असो. ।।६।।



[५]

ॐ नमो भगवते वायुनंदनने । ॐ नमो भगवते वायुनंदनने ।।१।।

ॐ नमो भगवते श्रीपरमात्मने । ॐ नमो भगवत्यादि नारायणने ।।२।।

वायुकंदनने वायुकंदनने । वायुकंदनने वायुकंदनने ।।३।।

भवभंजनने भयनाशनने । भ्रमसंहरने भजकरक्षकने ।।४।।

श्रीभीमरायाप्पा निंबरगी गोविंदने । श्रीवासुदेवाप्पा श्रीबलभीमने ।।५।।

श्रीगुरुलिंगन स्वामी केशवने । श्रीनारसिंहने करुणाकरने ।।६।।

आवरिग्गयर्पितू चरणक्केत्तने । भालप्रदेशदल्ली स्मरण कोट्टवने ।।७।।

सिद्धानंदेश्वर निंबरगीशने । शरणू शरणू नीने चिन्मयरूपने ।।८।।

प्रल्हादनू भजे हृत्कमलस्थने । सोऽहं हंसः मंत्रई प्राणस्पंदने ।।९।।

ॐ भगवते वायुपुत्र हनुमानाला नमस्कार असो. ।।१।।

ॐ भगवते श्रीपरमात्म्याला नमस्कार असो. ॐ भगवते आदिनारायणाला नमस्कार असो. ।२।।

वायुपुत्र हनुमानाला नमस्कार असो. ।।३।।

भवभ्रम दूर करून,भयाचा नाश करून भवनाचे रक्षण करणारे आपण आहात. त्या आपणास नमस्कार असो. ।।४।।

निंबरगीचे भीमरायाप्पा, गोविंद, श्रीवासुदेवप्पा, श्रीबलभीम हे एकच आहेत. त्यांना नमस्कार असो. ।।५।।

गुरुलिंगजंगमांचे स्वामी केशव, करुणाकर श्रीनारसिंह यांना नमस्कार असो. ।।६।।

आपल्या सर्वांच्या चरणावरती (हा) देह अर्पण केला आहे. त्यामुळे माझ्या ललाटी आपला स्मरण ठेवा प्राप्त झाला आहे. ।।७।।

हे सिद्धानंदेश्वर, मी आपल्या चिन्मयरूपाच्या ठिकाणी शरण आलो आहे. ।।८।।

प्रल्हाद आपल्या हृदयकमलस्थानामध्ये 'सोऽहं हंसः' हा मंत्र प्राणस्पंदात जपत आहे. ।।९।।

## [ ६ ]

जय जय वंदई नामा । जय जय यह्रनी नामा ।।१।।
जय जय नारायण नामा । जय जय गुरुलिंग नामा ।।२।।
जय जय भाऊराय नामा । जय जय सिद्धानंद नामा ।।३।।
जय जय प्रल्हादन नामा । जय जय ॐ नाम नामा ।।४।।

सर्व कांही तूच असलेल्या नामाला मी वंदन करतो. त्या नामाचा जयजयकार असो. ।।१।।
नारायण नामाचा जयजयकार असो. गुरुलिंग नामाचा जयजयकार असो. ।।२।।
भाऊराय नामाचा जयजयकार असो. सिद्धानंद नामाचा जयजयकार असो. ।।३।।
प्रल्हादाच्या नामाचा जयजयकार असो. सर्वनामांचे नाम जो ॐकार, त्याचा जयजयकार असो. ।।४।।

## [ ७ ]

प्रभु स्वामी प्रभु स्वामी चिमडद प्रभुस्वामी ।
सहस्रदलगिरिके वासिद अदु यामी ।।१।।

शिवस्वरूप अभेद ई नोडिद जनप्रेमी ।
साधु संत गुरु भक्तव अर्पितु गुरुनामी ।।२।।

सिद्धासनासिद नीने आस्थित शिव रामी ।
चिदांग ऐक्यवु होगिद मुप्पीन गुरुस्वामी ।।३।।

नमो जी सिद्धराज सिद्धमार्गगामी ।
सिद्धानंदनु प्रार्थितु सिद्धन निजधामी ।।४।।

सहस्रदलशिखरी राहणारे प्रभुस्वामी चिमड येथे वास करून आहेत ।।१।।
शिवस्वरुपाशी अभेदरुपाने असणारे जनप्रेमी (असे साधुमहाराज) पाहिले. असे हे संत, साधु आणि सर्वांचे गुरु असलेल्या साधुमहाराजांनी भक्तांना गुरुनाम प्रदान केले आहे. ।।२।।



शिव आणि राम स्वरूप असणारे आणि सिद्धासनामध्ये प्रतिष्ठित होऊन बसलेले (साधुमहाराज) मुप्पीन गुरुस्वामींच्या चिदांगाशी ऐक्य पावून आहेत. ।।३।।
असे हे सिद्धमार्गगामी सिद्धराज (साधुमहाराज) सिद्धांचे निजधाम असलेल्या सिद्धानंदांची प्रार्थना करुन त्यांना वंदन करीत आहेत. ।।४।।

## [ ८ ]

ना नीने गुरुराया गुरुराया । ना नीने गुरुराया ।।ध्रु।।
देह मन धन विल्ले प्राणेंबू व्यवहारन ।
शरीरद मुख्य प्राण नीने गुरुराया ।।१।।

प्राणप्रिय परमेश्वरनू यल्लवू सार ।
कडिदाटीसो पर तर सद्गुरुराया ।।२।।

कुळ गण गोत नीने तायीतंदी नीने ।
सिद्धानंद नानु नीने नम्म प्रभुराया ।।३।।

हे गुरुराया, मी तूच आहे. ।।ध्रु।।
देह, मन आणि धनाच्या व्यापारासाठी लागणारा प्राणच केवळ तू नाहीस तर हे गुरुराया, ह्या शरीरातील मुख्य प्राणदेखील तूच आहेस. ।।१।।
हे प्राणप्रिय परमेश्वरा, सद्गुरुराया, तूच या सर्वाचे (सृष्टीचे) साररूप आहेस. तूच या सर्वातून मला पैलपार कर. ।।२।।
माझे कुळ, गणगोत, मायबाप सारे तूच आहेस. हे प्रभुराया सिद्धानंदा, मी तूच आहे. ।।३।।

## [ ९ ]

दोड्ड जन्मद व्ययनू कडिदा ।
श्रीगुरुलिंगनु निमग श्रीशिव तोरिसिदा ।
यल्लवू अल्लमन जगदोळू धन्य जीवनू ।
बेळकनू प्रकाशने धन्यवू आगिदा ।।१।।

नीनविको चिंतेय माडिदा ।
ई नम्म स्वामी निन्न मनिगे लगू बंदा ।
आचरणन सिद्धानंद अवतारनु होगिद्वा ।
चित्तदल्ली नारायण स्थीरन वादा ।।२।।

हे अमूल्य आयुष्य क्षणाक्षणाने कुरतडले जात आहे. त्याचा नाश होतो आहे. (अशा जन्मामध्येच) श्रीगुरुलिंग यांनी तुम्हाला शिवदर्शन घडविले आहे. साऱ्या जगाचे विश्वमन असलेले आपले झळझळीत प्रकाशरूप पाहून जीवन धन्य झाले. ।।१।।
तुझ्याकरीता वाटणाऱ्या काळजीपोटी हे आमचे स्वामी तुझ्या घरी सत्वर आले आहेत. सिद्धानंदांच्या अवतारात प्रकटलेले नारायण (म्हणजेच श्रीगुरुलिंगजंगममहाराज) यांचे चरण चित्तामध्ये स्थिरावले आहेत. ।।२।।

[१०]

नारायण नारायण नारायण नामा ।
नारायण हृन्निवास दिन्ना इदु नेमा ।।१।।

माडुवऱ्यारु मरुळ निंबरगी ग्रामा ।
धवलतनू बलद बलऊ पालिसय्य गुणधामा ।।२।।

आशिमनसी कोडुवऱ्यारु नम्म स्वामि इदने ।
गुरुत कंड ई प्रचंड नासिद अदुकामा ।।३।।

यन्न माडिदा मरुळ चिदली वर्ण हेमा ।
गुरुनामद सक्रिमुत्त्या प्रसिद धामधामा ।।४।।

ॐ कोऽहं सोऽहं दळु प्रगट रवी सोमा ।
आकर्षितु आदिंद जीवने शिवप्रेमा ।।५।।

गुरुलिंगन सिद्धानंद गवियू सवि नामा ।
आचरणन कमलदल्ली घनानंद रामा ।।६।।



हृदय हेच ज्यांचे निवासस्थान आहे अशा नारायणाचे नाम घेणे हाच दररोजचा नेम आहे. ।।१।।
आपले वसतिस्थान असलेल्या निंबरगी गावाकडे माझे मन ओढले गेलेले आहे. आपल्या सामर्थ्यामुळेच आम्ही सुरक्षित आहोत. ।।२।।
मनातील इच्छा पूर्ण करणारे आपण, माझे स्वामी आहात. मनामध्ये उद्भवणाऱ्या भयंकर वासनांना ओळखून, अशा वासनांचे नाश करणारे तुम्ही आहात. ।।३।।
सुवर्णवर्णाचे आपले चैतन्यरुप मला आपणाकडे ओढून घेत आहे. 'साखर वाटणारा अज्जा'या गुरुनामाने आपण सर्व ठिकाणी प्रसिद्ध आहात.।।४।।
साधनेच्या ॐ, कोऽहं, सोऽहं अवस्थेमधून सूर्य व चंद्र प्रकट होतात. मंगलमय अशी जी प्रेमावस्था, तिचे जीवाला आकर्षण निर्माण झाले आहे. ।।५।।
गुरुलिंगमांच्या सिद्धानंदरूपी गुहेत गोड नाम आहे. (सिद्धानंदांच्या) त्या चरणकमलामध्ये रामाला घनानंद प्राप्त झाला आहे. ।।६।।

[११]

प्राणप्रिय परमेश्वरांबुजपद पूज सलिक्के ।
तम्मबरतिया तम्मबरतिया गुरुलिंग नोडलिक्के ।।१।।

बंद बंद लगवदू मगा हरि नोडिद यल्लन सार ।
भवभंगव वागुवे छलविदू कडिया भवपरपार ।।२।।

धन्य वागिदा धन्य वागिदा स्वामिकृपा अरुवार ।
रविशशिमार्गवु दिन्ना स्मरतू प्रल्हादेश्वर थार ।।३।।

हे बाळा, प्राणप्रिय अशा परमेश्वराच्या पदकमलाची पूजा करणेसाठी, आणि गुरुलिंगांचे दर्शन घेण्यासाठी चल. ।।१।।
हे बाळा, तू लवकर लवकर येऊन सगळ्याचे सार असलेल्या हरिरूपाचे दर्शन घे. त्यामुळे मायावी आणि दुस्तर अशा भवसागराचा नाश होऊन त्या पलीकडील (मोक्ष) स्थिती प्राप्त होणार आहे. ।।२।।

षड्रिपूंना वेसण घालणाऱ्या अशा माझ्या स्वामींची माझ्यावर कृपा झाली आहे. अशी कृपा झाल्यामुळे मी धन्य झालो आहे. आता सूर्य-चंद्र (इडापिंगला) मार्गाने जाऊन त्यांचे स्मरणात प्रल्हाद स्थिर झाला आहे. ।।३।।

[ १२ ]

गुरुलिंगजंगम गुरु कृपानिधे । श्रीनिंबरगी परमेशनय्या ।।१।।
जगदोळू अवतारवनु धरिसिदी । अखिल धर्मद मर्म कोट्टि तिळिसिदी ।।२।।
प्रभुदेव यन्नवू धन्यवू माडिदी । सत्चिदानंदनू साक्षात् तोरिसिदी ।।३।।
स्वरूपसांप्रदाय प्रतिपालकने । शरणू प्रल्हाद ई देवदेवरने ।।४।।

प्रत्यक्ष परमेश्वराचे अवतार, निंबरगीवासी, सद्गुरु , गुरुलिंगजंगम हे कृपेचे सागर आहेत. ।।१।।
हया जगामध्ये अवतार धारण करून त्यांनी अखिल विश्वामधील सर्व धर्मानी प्रतिपादन केलेला मर्म ठेवा दिला आणि तो समजावून सांगितला. ।।२।।
हे प्रभुदेवा मला धन्यता प्राप्त झाली आहे. कारण आपण मला आत्म्याच्या सच्चिदानंद स्वरूपाचे साक्षात दर्शन घडविले आहे. ।।३।।
स्वरूप संप्रदायाचे प्रतिपालन, संरक्षण करणारे देवांचेही देव अशा सद्गुरुंच्या ठिकाणी प्रल्हाद आहे. ।।४।।

[ १३ ]

नारायण श्रीहरी स्वामिन् नारायण श्रीहरी ।
आ नारायण ई नारायण ॐ नारायण हरी ।।१।।

हरि नारायण हरी स्वामिन् हरि नारायण हरी ।
ना नारायण नीदवदू श्रीनारायण चिद्हरी ।।२।।

प्रभु नारायण हरी स्वामिन् प्रभु नारायण हरी ।
अथ नारायण कथ नारायण हेळदंथ श्रीहरी ।।३।।

विभु नारायण हरी स्वामिन् विभु नारायण हरी ।
अल्ल इल्ल श्रीनारायण हरि यन्नारायण हरी ।।४।।



सिद्धानंद जय हरी स्वामिन् सिद्धानंद जय हरी ।
प्रल्हादन हृदयांतरली नी जय नारायण हरी ।।५।।

श्री हरी नारायण हे सर्वांचे स्वामी आहेत. 'तो' ही नारायण 'हा' ही नारायण असून ॐकार स्वरूपाने हरीनारायण सर्वत्र व्याप्त आहेत ।।१।।
हरीनारायण हे सर्वांचे स्वामी आहेत 'मी' ही नारायण, 'तू' ही नारायण असून चैतन्य रूपाने हरीनारायण सर्वत्र व्याप्त आहेत. ।।२।।
प्रभु नारायण हरी हे सर्वांचे स्वामी आहेत. नारायण हे पूर्ण स्वरूप असून त्यांचे वर्णन करता येत नाही. ते अनिर्वाच्य आहेत. ।।३।।
प्रभु नारायण हरी हे आपले स्वामी आहेत. माझे नारायण एके ठिकाणी नसून ते सर्वव्यापक आहेत. ।।४।।
प्रल्हादाच्या हृदयांतरी सिद्धानंदरूपाने स्थित असलेल्या हरीनारायणाचा जयजयकार असो. ।।५।।

[ १४ ]

गुरुलिंग गुरुलिंग गुरुलिंग नादेने ।
नेनसी गुरुलिंग गुरुलिंग सादेने ।।१।।

तायीतंदी बळगतीने तायीतंदी नीने ।
सूत्र मित्र इष्ट गोत्र यल्ल देवा नीने ।।२।।

राज रंक कुरूप सुरूप स्त्रीनु पुरुष नीने ।
नीनु नानु गुरु शिष्य ज्ञान्याज्ञानी नीने ।।३।।

बेडु काडु माताडु नीने वीरक्तीनु नीने ।
दया क्षमा शांति भक्ति वंदु देवा नीने ।।४।।

योगी त्यागी भोगी रागी जोगी देवा नीने ।
रोगी आगी होगी नीने जीवशिवनु नीने ।।५।।

काया माया जाया नीने प्राणलिंग नीने ।
नडे नुडी अय्य क्रीया नादानंद नीने ।।६।।

चरणोदक प्रसादनू पंचतत्त्व नीने ।
गुणागुण शून्य सगुण निर्गुणनू नीने ।।७।।

ऋषी मुनी संतसिद्ध साधु नाथ नीने ।
हरिभक्त गुरुभक्त गुरुपुत्र नीने ।।८।।

जपी तपी महानुभाव देवदेव नीने ।
योगीराव गुरुराव सांप्रदाय नीने ।।९।।

प्रल्हादेश्वरलिंगनू भावलिंग नीने ।
गुरुलिंग सिद्धानंद समाधान नीने ।।१०।।

गुरुलिंग, गुरुलिंग या शब्दांना सतत आठवून त्यांच्या स्मरणामध्ये राहू या ।।१।।
तूच माझे मायबाप, तूच माझे आप्तेष्ट, मित्र, गणगोत असून तूच माझ्या जीवनाचा सूत्रधार आहेस. ।।२।।
राजा-रंक, कुरुप-सुरुप, स्त्री-पुरुष तूच आहेस. मी-तू, गुरु-शिष्य ज्ञानी-अज्ञानी हे सर्व तूच आहेस. ।।३।।
याचक तूच, प्रसंगी कटू वचन बोलणारा तूच, साक्षात वैराग्य तूच आहेस. दया, क्षमा, शांति आणि भक्ति तूच आहेस. ।।४।।
योगी, त्यागी, भोगी, रागी, जोगी तूच असून रोगी व जीवशिवही तूच आहेस. ।।५।।
काया, माया, जाया तूच असून प्राणलिंग तूच आहेस. चालणे- बोलणे हया सर्व क्रिया तूच असून अनाहतनादातील आनंदही तूच आहेस. ।।६।।
तूच चरणोदकाचा प्रसाद असून पंचतत्त्व ही तूच आहेस. गुण-अगुण,शून्य, सगुण-निर्गुण हे सारे तूच आहेस. ।।७।।
ऋषी-मुनी, साधु-संत, सिद्ध, नाथ, हरिभक्त, गुरुभक्त, गुरुपुत्र तूच आहेस. ।।८।।
जपी, तपी, महानुभाव, योगिराव, गुरुराव, संप्रदाय व देवांचाही देव तूच आहेस.।।९।।
या प्रल्हादाच्या चित्तवृत्ती तूच असून आत्मदेवही तूच आहेस. तूच गुरुलिंग सिद्धानंद असून तूच माझे खरे समाधान आहेस. ।।१०।।



## [ १५ ]

सद्गुरु सिद्धानंद । जय जय सद्गुरु सिद्धानंद ।।धृ।।
श्रीनारायण गुरुलिंगनी । हरिसो यन्न भवबंध ।।१।।
श्रीनागाप्पाणा गुरुकरुणेय। अवतारद सुखकंद ।।२।।
हनुमंतप्रभू बोध कृपेयू ।निम्म बुद्धिगे छंद ।।३।।
तायितंदीनी कंदन प्रल्हाद । स्थीरनवा पदानंद ।।४।।

सिद्धानंद सद्गुरु आहेत. सद्गुरु सिद्धानंदांचा जयजयकार असो. ।।१।।
श्रीनारायण यानी (गुरुलिंगमहाराजानी) माझ्या भवबंधाचे हरण केले आहे. ।।२।।
साक्षात् सुखकंद असलेल्या श्रीनागप्पागुरुनी दया येऊन अवतार धारण केला आहे. ।।३।।
श्रीहनुमंतप्रभूनी (हणमंतराव कोटणीसमहाराजानी) कृपाळूपणे बोध केल्याने (मन) बुद्धीला केवळ आपलाच छंद लागला आहे. ।।४।।
आपणच माझे माय-बाप असून हा प्रल्हाद आपलाच पुत्र आहे. आपल्या पदी स्थैर्य मिळाल्याने मोठा आनंद प्राप्त झाला आहे. ।।५।।

## [ १६ ]

श्रीगुरुलिंगा श्रीभीमाण्णा । श्रीनागाप्पा गुरुसिद्धा ।
सिद्धानंदा ज्ञानप्रबोधा । महिमे अगाधा आगिद्दा ।।१।।
आवरु सुमंत्रनु सोऽहं सद्गुरु । हनुमंतने निनगे कोडिदा ।
जपी जपी सुवे धन्य नीनवदू । स्मरणमार्गवू होगिद्दा ।।२।।
श्री नारायण गुरुलिंगजंगम । कल्ल्यांतरल्ली आ बंदा ।
देवदेवरु आब्रह्म वदू । श्रुत्यन गोचर स्वरूपता बंदा ।।३।।

श्रीगुरुलिंगजंगममहाराज, श्रीभीमाण्णा, श्रीनागाप्पा, श्रीगुरुसिद्ध आणि ज्ञानस्वरूप असे सिद्धानंद हया सर्वांचा महिमा अगाध आहे. ।।१।।
सद्गुरु श्रीहनुमंतरायानी (श्रीहणमंतराव कोटणीसमहाराज यांनी) आमचा सोऽहं हा सुमंत्र तुला दिला. त्या सुमंत्राचा जप केल्याने स्मरणाचा मार्ग प्राप्त झाला. त्यामुळे तू धन्य झाला आहेस. ।।२।।

श्रुतीलाही अगोचर असलेले, देवदेवांनाही अप्राप्य असलेले ब्रह्माचे स्वरूप श्रीनारायण – गुरुलिंगजंगमांच्या रूपाने कलियुगामध्ये अवतरले आहे. ।।३।।

[ १७ ]

कण्णिरेनो महाकारणनात्मन् । स्थूल सूक्ष्म कारण हिच्चिदरे ।
साधन माडिदरे ।।१।।
आबल सूत्र नोड बेको । आ सूत्र ना वरं थैर बेको ।
छलो माड बेको ।।२।।
सहस्रारगिरिके होग बेको । सिद्धने पदने वाग बेको ।
अहंकारासुर होग बेको । नारायण गुरुलिंगजंगम ।
अपार नोड बेको ।।३।।

स्थूल, सूक्ष्म आणि कारण या तिन्ही देहापलिकडील महाकारण देहामध्ये स्थित असलेल्या आत्म्याच्या प्राप्तीसाठी साधन करावयास हवे. ।।१।।
यासाठी प्रथम सूत्रावर लक्ष ठेवून राहिले पाहिजे. अशाप्रकारे ठेवलेल्या लक्षाला चांगल्या प्रकारे स्थिरता प्राप्त झाली पाहिजे. ।।२।।
(तेथून पुढे) सहस्राधारचक्रस्थानी गेल्यानंतर अहंकाररूपी असुर नाहीसा व्हावयास हवा. सिद्धपदाचे दर्शन व्हावयास हवे आणि अनंतरूप अशा गुरुलिंगजंगममहाराजांचे दर्शन प्राप्त व्हावयास हवे. ।।३।।

[ १८ ]

सहजासन हाकी कोळ्ळीरिसी दवनू ।
भ्रूमध्यद दृष्टी नेल्लीसी दवनू ।।१।।

मेले यरडू चक्रद अरडौसी दवनू ।
त्रिदळ साधने नेम ई तोरिदनू ।।२।।

चक्रन मार्गवू हृतिळीसिदनू ।
अणु रेणु परमाणु गुरुलिंगजंगमनू ।।३।।



प्रथम सहजासन घालून स्थिर बैस. त्यानंतर भ्रूमध्यावर दृष्टी ठेव. ।।१।।
त्यानंतर उर्ध्वस्थानी असलेली दोन्ही चक्रे पाहून, समजून, उमजून घे. हा तीन भागांनी मिळून बनलेला साधन मार्ग पहा. ।।२।।
हा चक्रांचा (चक्रभेदनाचा) मार्ग समजून घेतल्याने सर्व अणु, रेणु व परमाणूमध्ये गुरुलिंगजंगमांचे दर्शन होईल. ।।३।।

[ १९ ]

दिन्ना परमात्मन प्रभु भजना ।
पूर्णैक्यद ज्ञानदल्ली समाधाना ।।१।।

नारायण भाऊ सद्गुरु स्वामि समर्थे ।
कोडिदा प्रसादवी गुरुलिंगन सत्ते ।।२।।

इदु नम्म स्वामीगे ब्रीदेंथा ।
गुरुलिंगजंगम तत्त्वता ।।३।।

ब्रीद सार्थव वागोनी माडिद ।
प्रगटनादा प्रल्हादा सिद्धानंद ।।४।।

त्या प्रभुपरमात्म्याचे दररोज भजन करून ज्ञानरूप होण्यातच खरे समाधान आहे. ।।१।।
सद्गुरु स्वामिसमर्थ नारायणभाऊ गुरुलिंगजंगममहाराजांच्या सत्तेने (शक्तिसामर्थ्याच्या योगे) हा प्रसाद दिला गेला आहे. ।।२।।
आमचे स्वामी गुरुलिंगजंगममहाराज यांचे तत्त्वरूपात (सत्यस्वरूपात) राहणे हे ब्रीद आहे. ।।३।।
त्यांच्या ब्रीदाप्रमाणे वागून तत्त्वरुप होण्यातच जन्माचे सार्थक आहे. आणि त्यासाठीच प्रल्हादासाठी सिद्धानंद प्रकट झाले आहेत. ।।४।।

## [२०]

षडचक्रावरिगे श्रीरामा त्रिकुटांतरदल्ली ।
प्रज्ञा झगि झगि सूवे रामा तेजवु बेळगली ।
ब्रह्मरंध्र गविदोळू रामा एरडू गतदल्ली ।
सोऽहं दीप प्रकाशवु रामा तिळिदवी झळाळी ।।१।।

जय देवा जय देवा रामा ॐकाररुपा ।।
निरंजन निरामय रामा जय निर्विकल्पा ।।ध्रु।।

सिद्धानंदन प्रभू श्रीरामा गुरुलिंगन अवतार ।
सहस्रार गिरिदोळू रामा नोडिदि सारासार ।
श्रीगुरुलिंगजंगम रामा नोडिद यल्ल अपार ।
प्रल्हादेश्वर वासिद रामा आदृश्यद परपार ।।२।।

हे रामा, षड्चक्रावरती त्रिकुटांतरी प्रज्ञेची झगझगीत पहाट होऊन तिचे तेज पसरले आहे. ब्रह्मरंध्रस्थानातील गुहेमध्ये दोन प्रकारच्या गती उत्पन्न होतात. (त्यानंतर) सोऽहं प्रकाशाच्या झगझगीत दीपाचे ज्ञान होते. ।।१।।
हे रामा, ॐकार रूप देवाचा जयजयकार असो. हे रामा, ॐकाराच्या निरंजन, निरामय आणि निर्विकल्प स्वरूपाचा जयजयकार असो. ।।ध्रु।।
हे रामा,श्रीगुरुलिंगजंगमांचे अवतार असलेल्या आणि सर्वांचे सार असलेल्या प्रभु सिद्धानंदांचे सहस्रदळशिखरावरती दर्शन तुला झाले. हे रामा, दृश्यादृश्याच्या पलिकडील अपार स्वरूपात वसती करुन असलेल्या गुरुलिंगजंगमांचे दर्शन तुला झाले. ।।२।।

## [२१]

छलो ई भालदल्ली साद । गुरुलिंग निन्न नमग छंद ।।१।।
छलो ई बुद्धिगविद नाद । गुरुलिंग नी आनंदकंद ।।२।।
छलो ई मनसी वचसी बोध । गुरुलिंग नी गुरुसिद्ध ।।३।।
छलो ई जीवनकला सुखद । गुरुलिंग नासिदादु भेद ।।४।।
प्रल्हादेश्वर सिद्धानंद । छलो गुरुलिंग दोळवा भेद ।।५।।



ललाटी उठणारा ध्वनी अत्यंत चांगला आहे. हे गुरुलिंगा, केवळ तुमचाच मला छंद लागला आहे. ।।१।।
बुद्धीपैल असलेला अनाहत नाद अत्यंत मधुर व चांगला आहे. हे गुरुलिंगा, आपण प्रत्यक्ष आनंदकंद आहात. ।।२।।
आपण वाणीने माझ्या मनाला केलेला बोध चांगला आहे. हे गुरुलिंगा, आपण सिद्धरूप आहात. ।।३।।
(आपण दाखविलेली) जीवनकला ही अत्यंत सुखद आणि चांगली आहे. हे गुरुलिंगा, (आपण सर्वप्रकारच्या) भेदाचा नाश केला आहे. ।।४।।
प्रल्हादेश्वर सिद्धानंद हे अत्यंत प्रिय आणि चांगले आहेत. हे गुरुलिंगा, (आता) सर्व प्रकारच्या द्वैताचा नाश झाला आहे. ।।५।।

## [२२]

गुरुलिंग जय गुरु । सोऽहं परंधाम भक्तरु ।।१।।
गुरुलिंगमहाराज गुरु । सोऽहं परंधाम भक्तरु ।।२।।
आशिर्वचनू कोडुवाता । चिद्वल्ली सुरतरु ।।३।।
अलक्ष अनाम बुद्धीवरिगे । स्वरूपावरु देवरु ।।४।।
सिद्धानंदन महालिंगमूर्ती । नोडुतवी मंत्ररु ।।५।।

सद्गुरु गुरुलिगांचा जयजयकार असो. भक्तांचे परमधाम असलेल्या आणि सोऽहं स्थानी स्थित असलेल्या गुरुलिंगांचा जयजयकार असो. ।।१।।
सद्गुरु गुरुलिंगमहाराजांचा जयजयकार असो. भक्तांचे परमधाम असलेल्या आणि सोऽहं स्थानी स्थित असलेल्या गुरुलिंगमहाराजांचा जयजयकार असो. ।।२।।
आपण दिलेल्या आशीर्वादामुळे हा चैतन्याचा कल्पवृक्ष प्राप्त झाला आहे. ।।३।।
हे देवा, बुद्धीपैल असलेले आपले स्वरूप नामरहित असून ते अलक्ष आहे. ।।४।।
सिद्धानंदांची महालिंगमूर्ती (ज्येष्ठ आत्मरूप) पाहून (मन) मंत्रमुग्ध होते. ।।५।।

[ २३ ]

ॐ रामेश्वरसुरने ॐ सोमेश्वरने ।
सोऽहं सद्गुरु स्थापितु तोरिसिद्यात्मखुने ।।१।।

महाकारण दल्ल्यार्पितु बिल्वदलने ।
मन चिद्बुद्ध्यहन्तने श्रीगुरुलिंगने ।।२।।

झगळीत्तवी झळाळ झगळिग्गे कणिने ।
त्रिगुणन वंदनु वंदे सिद्धानंदन्ने ।।३।।

देवरूप रामेश्वर व सोमेश्वर याना मी वंदन करतो. सोऽहं स्थानी प्रतिष्ठित असलेल्या सद्गुरुंनी (माझ्या ठिकाणी असलेल्या) आत्म्याची खूण दाखविली. ।।१।।
महाकारण देहामध्ये स्थित असलेल्या श्रीगुरुलिंगाना मन, चित्त, बुद्धी आणि अहंकाररुपी बिल्वदल अर्पण करतो. ।।२।।
त्रिगुणातीत असलेल्या तसेच त्रिगुणांचे उत्पत्तिस्थानही असलेल्या देदीप्यमान सिद्धानंदाना वंदन करतो. ।।३।।

[ २४ ]

यन्न प्राणवेंबुवे आरति माडिदी ।
सोऽहं गळु दळदोळू ऐक्यवु नागिदी ।।१।।

जयदेवा जयदेवा जय सोऽहं हंसा ।
जय जय गुरुराज हंसा ।।
बुद्धिगवियू नोडुत स्वात्मप्रकाशा ।।ध्रु।।

कंडे ना कंडे नी नासिकनू वरिगे ।
वळ्ळयदवी बंद प्रल्हादन विग्गे ।।२।।

मी प्राणज्योती लावून आपली आरती करतो. सोऽहं रूपाने व्यापून असलेल्या आपल्या रूपाशी मी ऐक्य पावलो आहे. ।।१।।



हे देवा, हे सोहं-हंसरूपी गुरुराजा, सूक्ष्म बुद्धिरूपी गुहेत असलेला आत्मप्रकाश मी पाहिला. हे सोहंरूपी सद्गुरुदेवा, आपला जयजयकार असो. ।।ध्रु।।
प्रल्हादांनी नासिकाग्रावरती विहंग दृष्टीने हा आल्हाददायक आत्मप्रकाश पाहिला. ।।२।।

[ २५ ]

निन्न ई सेवा नमगे मुट्टितु प्रल्हादा ।
त्रिपुरांतक ना निनुवे आगिद गुरुबोधा ।।१।।

आधाराग्निय चक्रद भेदा रवि कोट्टा ।
नाद बिंद कलिगे तोरिसी ई बिट्टा ।।२।।

त्रिगुण अहन्नासुरन माडिदवी त्रेधा ।
अललल अल्लवु लगु लगु नडि नन्न वेधा ।।३।।

काणद मुत्तू नुडि बा जन्म इदे कडिदा ।
सिद्धानंदन कोडुत प्रसाद ई कणिदा ।।४।।

हे प्रल्हादा, तुझी सेवा आम्हाला पोहोचली. त्रिपुरनाशक शिवाकडून तुला श्रेष्ठ प्रकारचे ज्ञान प्राप्त झाले आहे. ।।१।।
आधार, अग्नि चक्राचा भेद केल्याने सूर्याचे दर्शन झाले. नाद, बिंदू,कला ह्यांचा साक्षात्कार झाला आहे. ।।२।।
त्रिगुणरूपी असुरांचा पाडाव होऊन त्यांची मोठी त्रेधा उडाली. माझेच ध्यान लागलेला असा तू, आता लवकर लवकर चल. ।।३।।
सिद्धानंदांच्या कृपाप्रसादाने दृष्टीसमोर मोतीचुराचा साक्षात्कार झाला. त्यांच्याच कृपेने हा जन्म अखेरचाच ठरणार आहे. ।।४।।

[ २६ ]

नादन केडुत निद्रिय माडुत ब्रह्मागी ।
गुणगळु नादव केळुत आ ब्रह्मवनागी ।।१।।

दृष्टि कूडित नोडित निशिदिन आत्मप्रभा ।
मन बुद्धि चिद्गळू तेजन स्वयंभा ।।२।।

कत्तली चिद्वळू रत्न नोडी कोळ्ळी ।
सिद्धानंदन श्रीहरी निंतानो नोडि कोळ्ळी ।।३।।

ब्रह्मनिद्रेमाजी चालू असलेला अनाहतनाद ध्वनी रोक. ब्रह्मस्थानी त्या नादाची अखंड धारा ऐक. ।।१।।
त्यांनी प्राप्त करून दिलेल्या दृष्टीपुढे रात्रंदिवस आत्मप्रभा दिसते. त्यामुळे मन-बुद्धी स्वयंभू अशा चैतन्य तेजाने भरून जाते. ।।२।।
काळोखामध्ये दिसणारे चिद्रत्न पाहून घे. प्रत्यक्ष श्रीहरिरूप सिद्धानंद समोर उभे असलेले पाहून घे. ।।३।।

[ २७ ]

निंबरगीवाशा नीने पालिसो यन्ना ।
सितजनपाला श्रीगुरुलिंगने ।।१।।

सिद्धसंतर मेळ नोडिद निमगे ।
सहस्रार शिखरदल्ली रविचक्रद लीलैग्गे।।२।।

सिद्धानंद माडतेनू भजन मनसिग्गे ।
तेजबंबाळ इक्को चित्तवु झगळिग्गे ।।३।।

हे निंबरगीवाशा श्रीगुरुलिंगा, तूच माझे आणि इतर जनांचे रक्षण करून प्रतिपाळ करतोस. ।।१।।
सहस्रदळ शिखरावरती सूर्यप्रभेची लीला पाहिली. तेथे आपल्याच रूपात सिद्धसंतांचा मेळा पाहिला. ।।२।।



मनामध्ये सिद्धानंदांचे भजन करीत आहे. त्यामुळे चित्त झगमगणाऱ्या तेजाने व्याप्त झाले आहे. ।।३।।

[ २८ ]

गुरुलिंगजंगम पूजेय माडिद ।
मंडिसिद प्रल्हाद गुरु सिद्धानंद ।।१।।

मूळ लिंग प्राणलिंग भावलिंग नोडिद ।
आनाभिकमलन्न हृत्कंठ सहस्रद ।।२।।

ई पदे मंत्रोच्चर महामंत्रमूर्ती ।
ईड पिंगळ जोड गुडिसिद आत्मध्यान भक्ती ।।३।।

गुरुलिंग गुरवीनू सहस्रारवरिगे ।
परमार्थ प्रल्हादन गुरुनाम विग्गे ।।४।।

गुरुलिंगजंगमांचे अवतार असलेल्या सिद्धानंदांची पूजा प्रल्हाद मांडीत आहे. ।।१।।
पूजेमध्ये नाभिकमलाच्या ठिकाणी मूळलिंग, हृदयकंठाच्या ठिकाणी प्राणलिंग आणि सहस्रदलाच्या ठिकाणी भावलिंगाचे दर्शन झाले. ।।२।।
हया मार्गाने जाऊन म्हणजेच नाममंत्रोच्चाराने महामंत्रमूर्तीचा अनुभव आला. (नाम तेची रूप हा अनुभव आला). इडा आणि पिंगला यांचे ऐक्य होऊन लागलेले आत्मध्यान म्हणजेच भक्ती होय. ।।३।।
सहस्रदळामध्ये ते श्रेष्ठ गुरुलिंग स्थित असून गुरुनाम सतत घेणे हाच प्रल्हादाचा परमार्थ होय. ।।४।।

[ २९ ]

निन्नविग येनू रथारूढेल्ला नानू ।
नडि नडि लगु मनिगे प्रल्हादा नीनू ।।१।।

वैशाख कृष्ण सप्तमीगे गीताजयंती ।
हेळदंथव वागोनी नम्म वचनोक्ती ॥२॥

हेळरी हेळरी यन्न इंद यदु गूज ।
सिद्धानंदन गुरुलिंग नोड प्रभुराज ॥३॥

यल्ल निंद नमगे चित्तवू मुट्टीत्तू ।
सोऽहं सोऽहं मंत्रवु निंबरगी परमार्थू ॥४॥

मी तुझ्यासाठी अद्याप रथावर आरुढ झालेलो नाही. हे प्रल्हादा, तू लवकर लवकर घरी चल. ॥१॥
वैशाख कृष्ण सप्तमी हा गीताजयंतीचा दिवस आहे. आपल्या वचनाप्रमाणे वागणारा तू हो. ॥२॥
गुरुलिंगजंगमांचे अवतार असलेल्या प्रभू सिद्धानंदांचे दर्शन झाले. आता आपणास मला (परमार्थाचे) गुह्य सांगण्याची विनंती मी करीत आहे. ॥३॥
सर्व कांही मिळाल्याने अंतःकरण तृप्त आहे. आपल्याकडून सोऽहं सोऽहं हा निंबरगीपरमार्थाचा मंत्र मिळाला आहे. ॥४॥

**[ ३० ]**

निंद नुडिय वस्तू समाधान नागी ।
भासुर तेजवु कंडेन वळगी ॥१॥

परद सुषुम्न स्थळद भेदा रवि कोट्टा ।
साधीद गुरुमंत्र कर्णद बिट्टा ॥२॥

आजन्म आगित्तू सत् चिदानंदा ।
वंद सुख ई बंद गुरु सिद्धानंदा ॥३॥

आपले विशाल, प्रकाशणारे, तेजस्वी असे आत्मस्वरूप आतमध्ये पाहून अत्यंत समाधान वाटते आहे. ॥१॥
आपण कर्णामध्ये सांगितलेल्या गुरुमंत्राने सुषुम्नेच्या पलीकडे असलेल्या स्थितीला भेदून आत्मसूर्याची प्राप्ती झाली आहे. ॥२॥



सद्गुरु सिद्धानंदांच्यामुळे आता मला आजीव सच्चिदानंद अवस्था प्राप्त झाली असून मी सुखरूप झालो आहे. ॥३॥

**[ ३१ ]**

यण्णद कण्णद सण्णद दण्णद यन्नंथा ।
अडिगेरागुवे नानू करुणे यदवंथा ॥१॥

कंडेनु तुंबितु कणिगे यत्ता ई दिंदे ।
साश्वीर कण्णूर दळदोळू सुप जन्मन यंदे ॥२॥

मेच्चीद म्याना यणसद बिरदंटनु नोडो ।
सिद्धानंदनवाशी प्रल्हादन गूढो ॥३॥

बरलिक्के बरलारी साधन होगिद्वा ।
नडि नुडवीदे भव कडियानंदा गिद्वा ॥४॥

माझी करुणा येऊन दृष्टीमध्ये तुझ्या अत्यंत भव्य तसेच अत्यंत सूक्ष्म स्वरूपाच्या साक्षात्काराचा अनुभव दिलास. हे देवा, मी तुझ्या चरणी मस्तक ठेवतो. माझ्यावर करुणा कर. ॥१॥
ह्याच जन्मामध्ये या समयी चैतन्याचा मोहरीएवढा असणारा बिंदू दृष्टीला व्यापून उरलेला मी पाहिला. ॥२॥
हृदयामध्ये अंतरंगात असलेले अत्यंत श्रेष्ठ आणि अगणित सामर्थ्य असलेले चैतन्यस्वरूप सिद्धानंदवासी प्रल्हादाला अत्यंत प्रिय आहे. ॥३॥
स्वप्रयत्नाने साध्य नसलेले हे साधन तू चालता–बोलता म्हणजेच सहजपणे मला साध्य करून दिलेस. त्यामुळे ह्या भवसागरातून परपार होऊन मला आनंदाची प्राप्ती झाली आहे. ॥४॥

**[ ३२ ]**

मुप्पीनमुनीय गुरु बोधसुधे ।
पिडिद वचन दिन्ना चित्तली यंदे ॥१॥

गुणगळू बुद्धीगाविय वापदने बंद ।
बहु दोड्डुदि अनाहतनामृत सविद ।।२।।

येन सवी नाम येन सवी नाम ।
सिद्धानंद प्रबोधन श्रीहरि ॐ नाम ।।३।।

गुरु मुप्पिनमुनी यांनी पाजलेली बोधामृताची वचने चित्तामध्ये स्मरणरूपाने आहेत ।।१।।
बुद्धिरूपी गुहेमध्ये बोधामृतधारेची पेरणी झाली. तेथील श्रेष्ठ प्रतीचे अनाहतनादामृत अत्यंत गोड आहे. ।।२।।
सिद्धानंदानी बोध केलेले ओंकाररूपी हरिनाम अत्यंत गोड असे आहे. ।।३।।

## [ ३३ ]

आ ब्रह्म नादव घोषवनु केळू ।
संसरण संहार हरि गुरु दयाळू ।।१।।

चिदांग ऐक्यद गीतनू पाडुव ।
संगनु संतर मेळ दर्शित लिंग नोडिद ।।२।।

मंत्ररु आवरु महामंत्र मूर्तिगळू ।
बंदेनिंतू गुरुलिंग सद्गुरु ।।३।।

हरिरूप आणि अत्यंत दयाळू अशा सद्गुरूंच्या कृपेमुळे श्वासांचे होणारे सूक्ष्म संसरण थांबले असून त्यामुळे ब्रह्मनादाचा घोष ऐकू येतो. ।।१।।
चैत्यन्याचे ऐक्यगान म्हणणाऱ्या सत्संगतीचा लाभ झाल्यामुळे आत्मलिंगाचे दर्शन झाले आहे. ।।२।।
महामंत्रमूर्ति सद्गुरु गुरुलिंग यांनी (गुरुलिंगजंगममहाराज यांनी) येऊन (साक्षात् प्रकट होऊन) आपला पवित्र मंत्र दिलेला आहे. ।।३।।



## [ ३४ ]

ना नी नी नानीनेदू परमार्थ ।
वेददप्रणीत बोधवाक्यनू सिद्धांत ।।१।।

नन्नेदू निन्नेदू इन्नोळ खूण ।
कुडिदांतःकरण संतर वचन ।।२।।

वायोगविदल्ली वायरु प्रचीती ।
कुडीये नेमध्यान वायरविदू मती ।।३।।

सिद्धानंदन विवरु कोडतेनू प्रसाद ।
आ कमलदल्ली स्थीर होगिदा प्रल्हाद ।।४।।

मी तूच आहे. (अहं ब्रह्मास्मि) हा वेदप्रणीत बोधवाक्यातील सिद्धांत हेच खरे परमार्थाचे सार आहे. ।।१।।
मी, तू व इतर सर्व वेगवेगळे दिसत असलो तरी सर्वांची अंतःकरणे सारखीच आहेत हीच संतांच्या उपदेशातील वर्मखूण आहे. ।।२।।
(ऊर्ध्वगामी) झालेल्या वायुगतीमध्ये चैतन्याची प्रचीति येते. नेम आणि ध्यान करून या बुद्धीमध्ये चैतन्याची प्राप्ति होते. ।।३।।
अशा तऱ्हेने विशद करून सिद्धानंदानी दिलेल्या प्रसादामुळे त्या चैतन्यकमलदलामध्ये प्रल्हादाला स्थैर्याचा लाभ झाला आहे. ।।४।।

## [ ३५ ]

गुरुलिंगने कोट्टरेनू पुण्य दिंद निनगे ।
गुरुलिंगप्रसाद गीतनवीग्गे ।।१।।

निनगे नम्मंथा अवरंथा माडिद ।
हेळुदंथव वागोनी कोट्ट पडसाद ।।२।।

यल्ल निंद नमगे मुट्टीतू प्रल्हादा ।
आनंदागितू गुरु सिद्धानंदा ।।३।।

तुझ्या पूर्वपुण्याईने गुरुलिंगजंगममहाराजानी तुला 'गुरुलिंगप्रसादगीता' दिलेली आहे. ।।१।।
त्यांनी सांगितल्यासारखे होऊन त्यांना जो प्रतिसाद तू दिलास त्यामुळे तुला आमच्यासारखे, त्यांच्यासारखे (म्हणजेच गुरुलिंगजंगममहाराजांच्यासारखे) केले आहे. ।।२।।
हे प्रल्हादा, तुझे सर्व आम्ही भरून पावलो असून त्यामुळे गुरुसिद्धानंदाना खूप आनंद झाला आहे. ।।३।।

[ ३६ ]

कायो ई विषयन्न मोहरे माडिद ।
कण्णिद दळदोळू ज्योति काणे वलिद ।।१।।

मनसी चिद् नोळगिद्द मक्कळ मडिद ।
दिन्ना हरि हर चिंती उद्योग व्यापारद ।।२।।

मौन मनसी हिडिद वृत्ति मुद्रिद बलिद ।
निःसंगात्मनु तिळिद सिद्धानंद वच हिडिद ।।३।।

या देहामध्ये विषयवासनांची रास भरली आहे. विषयवासनांचा पडदा मध्ये आल्यामुळे डोळ्यांना आत्मज्योत दिसत नाही. ।।१।।
चैतन्याचे दर्शन घेण्याची मनामध्ये खूप इच्छा आहे. परंतु हे हरिहरा, दररोज संसारामधील उद्योग व्यापाराचेच फक्त चिंतन होत राहते. ।।२।।
(अशावेळी) मौनमुद्रा दृढ वृत्तीने धारण करून सिद्धानंदांच्या वचनाचे मनामध्ये चिंतन केल्यानेच त्या निःसंग अशा आत्म्याचे ज्ञान होणार आहे. ।।३।।

[ ३७ ]

न्याय माडो नी देवा नी नमगे न्याय माडो ।
न्यायान्याय माडो देवा नी न्यायान्याय माडो ।।ध्रु।।



प्रेम कोडो देवा नी निम्म प्रेम कोडो ।
भक्तिप्रेम सुखवु सार इदु प्रेम कोडो ।
आवर विवरु हश्य छलो नीळवाडो ।।१।।

शिव माडो देवा यन्ना इवंदु शिव माडो ।
सिद्धानंद प्रल्हादन अदवदू गूढो ।
कृपादृष्टी नोडो देवा दयादृष्टी नोडो ।।२।।

न्याय कर. देवा, तू आम्हास न्याय कर. (माझी चूकभूल पाहून) न्यायान्याय कर. उचित ते तू कर. ।।ध्रु।।
देवा, तुझे प्रेम आम्हाला दे. भक्तिसुखाचे सार म्हणजे तुझे प्रेम होय. ते तुझे प्रेम आम्हाला दे. आमच्या बुद्धिरूपी गुहेत वास्तव्य करुन आपले स्वरूप उलगडून दाखव. ।।१।।
देवा तू मंगलकारक हो, कल्याणकारक हो. सिद्धानंद हे प्रल्हादाच्या अंतरंगात खोलवर वास करुन आहेत. हे देवा, तुझी कृपादृष्टी राहू दे. तुझी दया दृष्टी राहू दे. ।।२।।

[ ३८ ]

गुरुलिंगजंगमा नी दया माडो ।
कर्तानी धर्तानी हर्तानी कृपा माडो ।।१।।

भाष्य बरुदिल्ला ज्ञान तिळुदिल्ला ।
काडी बेडुवेनल्ला नाऊ दया माडो ।।२।।

विश्वनू रक्षीपा लक्ष्मीपते नी ।
करुणा केळीवलिदू याके दया माडो ।।३।।

सिद्धानंदन प्रल्हादन नी चिन्मयगूढो ।
हौदविंथा नी देवा दासने दया माडो ।।४।।

श्रीगुरुलिंगजंगमा, तू दया कर. तूच सर्वांचा कर्ता, धर्ता, हर्ता आहेस. तू कृपा कर. ।।१।।

कोणत्याही गोष्टीचे ज्ञान नाही. भाष्य येत नाही. काही मागून आपणास कष्ट देत नाही. आता दया कर. ।।२।।
साऱ्या विश्वाचे रक्षण करणारा लक्ष्मीपती तू आहेस. ही माझी करुणेची वचने ऐकून दया कर. ।।३।।
सिद्धानंदांच्या आणि प्रल्हादाच्या अंतरंगात खोलवर वास करून असणाऱ्या हे देवा, या दासावर दया कर. ।।४।।

[ ३९ ]

यज्जीवने मती कोडो ब्रह्ममूर्ती ।
गुरुलिंग वरद भक्ती बीडदंथे ।।१।।

परद विचार ब्याड खुल्लवा चक्रवाड ।
तोरिसी नोड नोड सय्यारयींथे ।।२।।

यष्टु हेळली नष्ट पंथ नोडिदावचट ।
दृग् कडिदाटीसो प्रल्हादन करुणेंथे ।।३।।

हीन देही कष्टवनू बडलारे ।
चैतन्या विदेही सुखवनू सारैंथे ।।४।।

हे ब्रह्ममूर्ती गुरुलिंगा, ह्या जीवनामध्ये माझ्याकडून अखंड भक्ती घडावी अशी बुद्धी दे. ।।१।।
कोणताही आडपडदा नको. आता आपले सरळ, उघड आणि व्यापक स्वरूप दाखव. ।।२।।
काय सांगू ,अवचितपणे (देहबुद्धीचा) हानिकारक मार्ग दिसला. आणि प्रल्हादाची करुणा येऊन त्यांनी पैलपार होण्याचा मार्ग दाखविला. ।।३।।
अखंड सोबत असणाऱ्या हीन देहाला साधनेने कष्टवून विदेहीपणे चैतन्याचे सुख प्राप्त होते, हेच सगळ्याचे सार होय. ।।४।।



[ ४० ]

दया माड बेको करुणाघन माड बेको ।
कृपा माड बेको नी कृपा माड बेको ।।१।।

यन्न यल्लवु दोष यणिसदे दया माडो ।
त्रिभुवन वळगे ई व्याप्त श्रीहरी आत्मा ।।२।।

संतन वलियदे ज्ञानमार्गवु काणे ।
तेज हरि कोटी ई भानुजनक प्राणे ।।३।।

प्राणेशा विठ्ठला ई महाराजा ।
सिद्धानंद करुणेयू आ बंद तेजा ।।४।।

हे करुणाघना, तू दया करावयास हवी. तू कृपा करावयास हवी. ।।१।।
त्रिभुवनामध्ये व्याप्त होऊन राहिलेल्या, हे आत्मरूप हरि, माझ्या सर्व दोषांचे हरण करून माझ्यावर दया कर. ।।२।।
तेजस्वरूप हरीने सूर्याला जन्म देऊन त्यामध्ये प्राण ओतला. (त्याच हरीने) संतांसाठी पायउतार होऊन त्यांना ज्ञानमार्ग दाखविला. ।।३।।
महाराजसिद्धानंदानी दाखविलेल्या करुणेमुळे तेजस्वरूप प्राणेश विठ्ठल प्रकट झाला. ।।४।।

[ ४१ ]

क्लेश हरिसो यन्न श्रीगुरुलिंगा ।
बारो मनिगे रंगा अंतररंगा ।।१।।

आज्ञेयू गुणदोष यल्ल सुरंगा ।
करुणेयू बोधसुधे ई भवभंगा ।।२।।

निन्न निनगे मुट्टीतू सद्गुरु रंगा ।
माडो देवा निनुवे कृपायावरु मगा ।।३।।
सिद्धानंद माडतेनू प्रार्थनानंगा ।
माडिसो प्रल्हादने असंगन संगा ।।४।।

हे श्रीगुरुलिंगा, माझे सर्व क्लेश दूर कर माझ्या घरी ये. माझ्या अंतरंगात प्रकट हो. ।।१।।
तुझ्या आज्ञेने माझ्यामधील गुणदोषांना सुरुंग लागू दे. तुझ्या करुणेच्या बोधामृतामुळे ह्या भवाचा नाश होऊ दे. ।।२।।
हे सद्गुरु, जे तुझे आहे तेच तुझ्यामध्ये येऊन मिळाले आहे. हे देवा, या पुत्रावरती कृपा करा. ।।३।।
त्या असंगाचा संग घडावा अशी प्रार्थना प्रल्हाद सिद्धानंदांना करीत आहे. ।।४।।

[ ४२ ]

जड गुण गळ हरिसो गुरुराया ।
प्रेमन भक्तिवळ्ळे तोरिसो महाराया ।।१।।
कंदन पालिसो केट्ट राग दोषो ।
तन मन धन वेल्ला बंदे गुरुराया ।।२।।

स्थिरविल्ल देहवू इदु स्थिर वाग बेकू ।
परिभव हरिसो नी प्रल्हादन काया ।।३।।

हे गुरुराया, (माझ्या बुद्धीतील) जड गुणांचा, तमोगुणांचा नाश करा. हे महाराया, आपल्या भक्तिप्रेमाचा अनुभव द्या. ।।१।।
हे गुरुराया, अत्यंत वाईट असलेल्या विकार, आसक्ति या दोषांपासून तुमच्या पुत्राचे रक्षण करा. तन, मन, धन हे सर्व व्यर्थ ओझे आहे. ।।२।।
देहबुद्धीचे हरण झालेल्या प्रल्हादाच्या देहाला स्थैर्य प्राप्त होऊन त्याच देहामध्ये हे भक्तिप्रेम स्थिरावू दे. ।।३।।

[ ४३ ]

नन्न यल्लार्पितु देवा नन्न यल्लार्पितू ।
चित्त समर्पितु देवा चित्त समर्पितू ।।१।।

पापपुण्यार्पितु देवा पापपुण्यार्पितु ।
गुणदोषार्पितु देवा गुणदोषार्पितु ।।२।।



सुखदुःखार्पितु देवा सुखदुःखार्पितु।
दृश्यादृश्यार्पितु देवा दृश्यादृश्यार्पितु ।।३।।

गणगोतार्पितु देवा गणगोतार्पितु।
इदे कामार्पितु देवा इदे कामार्पितु ।।४।।

रामेश्वर स्वरूप गुरु लिंगेश्वरने ।
प्रल्हाद समर्पितु चरणक्क इतने ।।५।।

हे देवा, माझे सर्व मी तुला अर्पण केले आहे. माझे चित्त तुला समर्पण केले आहे. ।।१।।
हे देवा, माझे पाप-पुण्य तुला अर्पण केले आहे. माझे गुण-दोष तुला अर्पण केले आहेत. ।।२।।
हे देवा, माझे सुख-दुःख तुला अर्पण केले आहे. माझे दृश्य-अदृश्य तुला अर्पण केले आहे. ।।३।।
हे देवा, माझे गणगोत तुला अर्पण केले आहे. माझ्या सर्व इच्छा तुला अर्पण केल्या आहेत. ।।४।।
रामेश्वरस्वरूप असणाऱ्या गुरुलिंगेश्वर (यांच्या चरणी) प्रल्हाद हा देह अर्पण करीत आहे. ।।५।।

[ ४४ ]

चिंता मनिगे ब्याडी ई चिंता ब्याडी ।
साधन ई नडि नुडी इदे जन्म कडी ।।१।।
विठ्ठल सत् चिद आनंदकंदा ।
महाराज वचनेयू निनुवे मनिगे बंदा ।।२।।

हिंगे हेळतेनू प्रल्हादवी गूज ।
यल्ल यल्लवु नोडसी श्रीसद्गुरुराज ।।३।।

मनामध्ये चिंता करू नकोस. अशी चिंता करू नकोस. साधन करून हाच जन्म शेवटचा करून घे. ।।१।।

महाराजांच्या वचनाप्रमाणे प्रत्यक्ष सच्चिदानंद श्रीविठ्ठल तुझ्या घरी आला आहे. ।।२।।
असे हे गूज प्रल्हादाला सांगितले आहे. हे प्रल्हादा,आता तू सर्वत्र श्रीसद्गुरुराजांना पहा. ।।३।।

[ ४५ ]

यल्ल जीवद नाकू गती गळवू ।
नडतेय बलऊ देवर बलवू ।।१।।

अदू बीज दंते बेळे ध्वनीयंते मती ।
हेज्जे हेज्जे गयी क्षण नडयती ।।२।।
सय्या नुडियंते नडयीरू विनिसिवनू ।
सिद्धानंद बोधे ई प्रल्हादनू ।।३।।

प्रत्येक जीवाने खालील चार मार्गाचे आचरण करावे कारण आचरणाचे बळ देवापेक्षा श्रेष्ठ असते. ।।१।।
जसे बी तसे धान्य. जसे श्रवण तशी बुद्धी. प्रत्येक पावलोपावली क्षणाक्षणाने काळ चालला आहे. (मरणाचे स्मरण असावे) ।।२।।
वागण्याबोलण्यात नम्रता असावी. आपण जसे बोलतो तसे वागावे. अशाप्रकारे सिद्धानंदांनी प्रल्हादाला हा बोध केला. ।।३।।

[ ४६ ]

दोड्ड प्रपंचदोळू सुखविल्ल ।
मनसिग्गे बोधे ई झलाल ।।१।।

सद्गुरु गळ प्राप्ती मनसी दिंद ध्यान ।
संसारदल्लयुदास परमार्थदल्ली प्राण ।।२।।

मरवन्नू बिट्टा अरवीदल्लीरोण ।
दिनरात्री हगळू कुडिये आत्मध्यान ।।३।।



प्राणप्रियेश्वरन चाकरी इदे धर्मवू ।
एल्लाकेल सक्के परमात्मन्ने मुंदेवू ।।४।।

सिद्धानंदन ई परमार्थ मुख्य मार्गवू ।
कल्पनेय त्याग प्रल्हादन अनुभावू ।।५।।

प्रपंचामध्ये फार मोठे सुख नाही. त्याचा मनामध्ये बोध करून घे. ।।१।।
संसार उदासीनवृत्तीने करणे हा परमार्थातील प्राण आहे. सद्गुरुंच्या प्राप्तीसाठी मनामध्ये सतत त्यांचे ध्यान हवे. ।।२।।
बाकी सर्व गोष्टी विसरून दिवस-रात्र आत्म्याचे ध्यान करून त्याच्या स्मरणात रहावयास हवे. ।।३।।
त्या प्राणप्रिय ईश्वराची चाकरी करणे हाच खरा धर्म आहे. त्याकरिता संसारातील प्रत्येक कर्म त्याला साक्षी ठेवून त्याला पुढे करून व्हावयास हवे. ।।४।।
सिद्धानंदांनी परमार्थाचा हा मुख्य मार्ग सांगितला आहे. या मार्गाने गेल्याने कल्पनेचा त्याग घडतो असा प्रल्हादाचा अनुभव आहे. ।।५।।

[ ४७ ]

इंद्रियनिग्रह चलो बुद्धीयू विवेक ।
प्रथम ई कामनन्ने कोल्ल बेक ।।१।।
जडतत्त्वन्नू गूणनू हाकबारदू ।
तन्न यन्न कैकळगे माडबारदू ।।२।।

कुडीन मनसन्नू नोयिसा बारदू ।
सत्यासत्य हिरियर सेवेदू ।।३।।

तन्नंते पररन्नू नोडोण ।
परोपकार दयेयू समाधान ।।४।।

कोट्टदरल्ली देवदेवरु समाधान ।
कोट्ट जीवन्न उद्योगन साधन ।।५।।

माडुव रीती तुकदिंद नडेयोण ।
प्रपंचदल्ली परमार्थ सत्चिंतन ।।६।।

अदू ओळकाळग दिंद्यानंदप्राप्ती ।
होरकाळग दिंद सय्या दुःखदगती ।।७।।

स्वराज्यसाधने सद्गुणसेवन ।
बोधसुधे ई सद्गुरु सिद्धानंदन ।।८।।

बुद्धीमध्ये सारासार विवेक करून इंद्रियनिग्रह करावा. त्यासाठी प्रथम सर्व मारले पाहिजे. त्यांचा नाश झाला पाहिजे. ।।१।।
तमोगुणात्मक जड तत्त्वांचा स्वीकार करू नये. मी आणि माझे अशा स्वार्थी वृत्तीचा अंगीकार करू नये. ।।२।।
सत्यासत्य बुद्धी जागृत ठेवून वडिलधाऱ्या मंडळींची सेवा करावी. कोणाचेही मन दुखवू नये. ।।३।।
स्वतःसारखेच इतरांना समजून त्यांच्याशी वागावे अशा बुद्धी आणि परोपकाराने वागण्याने समाधान मिळते. ।।४।।
देवाने जे दिले त्यात समाधान मानावे. प्राप्त झालेल्या ह्या जीवनामध्ये साधन करणे हाच खरा उद्योग समजावा ।।५।।
जीवनात आपण आचरत असलेल्या कर्मामध्ये समतोलपणा असावा. प्रपंचामध्ये सत्चिंतन करून परमार्थ साधावा. ।।६।।
संसारामध्ये स्वावलंबाने विद्या आणि आनंद मिळतो तर परावलंबनाने केवळ दुःखच मिळते. ।।७।।
सद्गुणांची प्राप्ती करुन घेणे हेच स्वराज्याचे म्हणजेच आत्मसत्तेचे खरे साधन आहे. अशा प्रकारे सद्गुरु सिद्धानंदांनी उपदेश केला आहे. ।।८।।

[४८]

नमो नमोजी सिद्धरभक्तगे ।
घोसरवाडदल्ली सावित्रिने ।।१।।



अंतरली संतोषिद आ रेवणसिद्ध ।
अवतार नागी प्रगट हालसिद्ध ।।२।।

भक्तर मनिगेयू हालगे प्रगटादा ।
दर्शन बंदितु सिद्धानंदन प्रल्हादा ।।३।।

घोसरवाडस्थित सिद्ध आणि भक्त अशा सावित्रीस नमस्कार असो. ।।१।।
अंतरंगात संतोष पावलेले रेवणसिद्ध हे हालसिद्ध अवतारामध्ये प्रकट झाले आहेत. ।।२।।
भक्ताच्या घरी प्रकट झालेल्या हालसिद्धांच्या दर्शनासाठी सिद्धानंदांचा प्रल्हाद आला आहे. ।।३।।

[४९]

को जाग्रति कोजागिरि पौर्णिमे आगिद ।
लक्ष्मीनारायण निनुवे मनिगे बंद ।।१।।

जीवन दारिद्य यल्ल नासिद ।
याक चिंतेय माडिद चिंतेय माडिद ।।२।।

अभंग प्रसादनू नादवू कोडिद ।
शिवात्मनु श्रीमंत आवरंथा माडिद ।।३।।

गुरुलिंगजंगम कृपावरु साद ।
गुरुखूण नोडिद प्रल्हादानंद ।।४।।

कोण जागे आहे असे म्हणत कोजागीरी पौर्णिमा आलेली आहे. (याचवेळी) आपण लक्ष्मीनारायण घरी आला आहात. ।।१।।
जीवनातील दारिद्र्याचा नाश झालेला आहे. त्यामुळे आता चिंता कसली करायची? ।।२।।
अखंड अशा अनाहतनादाचा प्रसाद देऊन शिवात्म गुरुलिंगजंगमांनी आपल्यासारखे मजला श्रीमंत केले आहे. ।।३।।
गुरुलिंगजंगमांच्या कृपेची गुरुखूण म्हणून प्राप्त झालेला आनंद प्रल्हादांनी पाहिला. ।।४।।

## [ ५० ]

रेवण मरुळ श्रीकाडसिद्ध गुरु । गुरुलिंग साधु राम हनुमंता ।।
दीपावली इन्ने अदुनमग । दर्शन बंदितु गुणवंता ।।१।।
दिवाळी दसरा नम्म सणविदू । नारायण बंदे इंथा ।।
तिमिरन संकट दानवांतक । पतितोद्धार श्रीगुरुनाथा ।।२।।
नरकासुर नासिद अंतरली । धर्म प्रतिपालक सत्ता ।।
प्रल्हादेश्वर गुरुलिंगजंगम । वासिद श्रीशिव हृदयस्था ।।३।।

रेवणसिद्ध, मरुळसिद्ध, काडसिद्ध, गुरुलिंगजंगममहाराज, रघुनाथप्रिय साधुमहाराज, रामचंद्रमहाराज (चिमडचे महाराज), हनुमंतराय कोटणीसमहाराज ह्या सर्व गुणवंतांचे दीपावली दिवशी दर्शन झाले. ।।१।।
अज्ञान अंधाकार दूर करणारे, संकटरूपी दानवांचा नाश करणारे पतितोद्धारक असे श्रीगुरुनाथ नारायण (सद्गुरु गुरुलिंगजंगममहाराज) दिवाळी, दसरा या आमच्या सणादिवशी (आमचेकडे) आले. ।।२।।
अंतःकरणातील नरकासुराचा नाश करून, धर्माची सत्ता प्रस्थापित करून त्याचे प्रतिपालन करण्यासाठी ते आलेले आहेत. ज्यांच्या हृदयामध्ये शिव वास करून आहे असे प्रल्हादेश्वर गुरुलिंगजंगममहाराज प्रल्हादाच्या ठिकाणी वास करून आहेत. ।।३।।

## [ ५१ ]

आरती शंकर सांबा । शिवशंकर सांबा ।
शिव हर हर हर सांबा । जय हर हर सांबा ।।१।।
हिमगिरिदल्ली निवासिद । चिद्गगन गाभा ।
गौरीशंकर शिखरन । चैतन्यन शोभा ।।२।।
गुरुत कंड प्रचंड ई । तेजन स्वयंभा ।
आविश्वद आदृश्यद । सत्य मुलारंभा ।।३।।
प्रल्हादेश्वर चिंते । सोऽहं नात्मप्रभा ।
हेमवर्ण नी मरुळ । माडिद दृश्य नभा ।।४।।



मी सांब सदाशिव शंकराची आरती करतो. त्या शिवशंकर सांबाची आरती करतो. हर हर सांबसदाशिवाचा जयजयकार असो. ।।१।।
चिदाकाशाचा गाभा म्हणजे जणू कांही हिमालयातील गौरीशंकर शिखरच होय. अशा ठिकाणी शिवशंकराचे निवासस्थान आहे. या ठिकाणच्या चिदाकाशातील चैतन्याची शोभा अवर्णनीय आहे. ।।२।।
अशा चैतन्याचे दृश्य म्हणजे तेजाची प्रचंड अशी रास आहे. विश्वाचे मूळ कारण असलेल्या भव्य तेजोराशीची ओळख झाली. ।।३।।
प्रल्हादेश्वरासाठी अत्यंत व्याकुळ असलेल्या मला अत्यंत मोहक अशा सुवर्णवर्णांनी वेढलेल्या आकाशाप्रमाणे सोऽहं मधील आत्मस्वरुपाच्या प्रभेचे दर्शन झाले. ।।४।।

## [ ५२ ]

जय जय जय बोधसुधे । महिमे अगाधे ।
आरती ई माडिदी ।गुरु परमानंदे ।।१।।
पठण नडियू प्रसादनु । पुण्य आगदित्तू ।
जगदोळू धन्यऊ । धन्यन वागित्तू ।।२।।
दोड्ड बलऊ नामद । येन सवी सविद ।
स्थीरागिद प्रल्हाद । गुरु सिद्धानंद ।।३।।

सद्गुरु हे परमानंद स्वरूप आहेत. त्यांचा जयजयकार करून त्यांची आरती करतो. आपण प्रत्यक्ष ज्ञानामृत आहात. आपला महिमा अगाध आहे. ।।१।।
(आपण सांगितल्याप्रमाणे) पठण व आचरण केल्याने आपली कृपा प्राप्त होते. आपली कृपा प्राप्त होणे हेच मोठे पुण्य आहे. अशी कृपा प्राप्त झाल्याने धन्यता प्राप्त झाली आहे. ।।२।।
हे गुरु सिद्धानंदा, आपले नाम श्रेष्ठ आणि शक्तिसमन्वित असे आहे. या नामाची रुची अत्यंत गोड आहे. अशा नामाने प्रल्हादाला स्थिरता प्राप्त झाली आहे. ।।३।।

[ ५३ ]

आरती नारायणा । जीव ज्योतीगे जीवना ।।
साकारनू ब्रह्ममूर्ती । नीने तेजो निधाना ।।१।।
प्रभु स्वामी काडसिद्ध । तुकारामनावतार ।
साधने सांप्रदाय । अदवीदू बडिवार ।।२।।
नारायण गुरुलिंग । जगप्रसिद्ध वागिदा ।
प्रल्हाद होगिदू शरण । गवियन मोद माडिदा ।।३।।

हे नारायणा, मी आपली आरती करतो. आपण साऱ्या जगतातील जीवांचे जीवन आहात. आपण साक्षात सगुण ब्रह्ममूर्ती असून तेजाचे निधान आहात. ।।१।।
काडसिद्ध ज्यांचे सद्‌गुरु आहेत असे आपण साक्षात तुकारामांचे अवतार आहात. आपण ह्या साधन संप्रदायाचे वैभव वाढविलेत. ।।२।।
नारायण गुरुलिंगजंगम या नावाने आपण जगप्रसिद्ध आहात. हा प्रल्हाद तुमच्या चरणी शरण येताच त्याच्या अंतरात मोद (ज्ञानबोध) केलात. ।।३।।

[ ५४ ]

जय जया जय जया जय श्रीसमर्था ।
गीतारत्न त्रयोदश दोळू प्रतिष्ठिता ।।१।।
श्रीरामा जय रामा जय जया रामा ।
ई पदे मंत्रोच्चर सोऽहं अभिरामा ।।२।।
(मुनिजन मानस हंस परात्पर अभिरामा ।।२।।)
विस्तारागिद शाखा विज्ञानस्वरूपा ।
जय जय जय गुरुलिंगा जय निर्विकल्पा ।।३।।
सहस्रार मणिपूरा सप्तम मंडलगे ।
सिद्धानंदन वादिंदागिद सप्तमीगे ।।४।।
श्रीहनुमंतकृपामृत भेट्टी आत्मनाथा ।
प्रल्हादन ई चिंते गुरुलिंगनाथा ।।५।।



ज्यानी तेरा 'गीतारत्नाची' स्थापना करुन त्याचा गौरव केला, अशा श्रीसमर्थांचा जयजयकार असो. ।।१।।
श्रीराम जयराम जयजय राम हया (तेरा अक्षरी) मंत्राचा उच्चार म्हणजे अत्यंत आल्हाददायक, सौख्यकारक अशा सोऽहंचाच उच्चार होय. ।।२।।
(हया मंत्रोच्चाराचाच) पुढे विविध ज्ञानस्वरूपामध्ये विस्तार झाला आहे. हे निर्विकल्प गुरुलिंगा, आपला जयजयकार असो. ।।३।।
सप्तमस्थानी असलेल्या सहस्रार पुष्पामध्ये आपण सिद्धानंदांच्या अवतारात स्थित आहात. ।।४।।
आत्मनाथ श्रीहनुमंतराय यांचे (हनुमंतराय कोटणीसमहाराज यांचे) कृपामृत प्राप्त झाल्याने प्रल्हादाच्या हया चित्तामध्ये गुरुलिंगनाथ (श्रीगुरुलिंगजंगममहाराज) वास करून आहेत. ।।५।।

[ ५५ ]

जय जया सिद्धानंदा । शेजारती माडुवे सिद्धा ।
महिमे अगाधा । निरंजन प्रसिद्धा ।।१।।
नारायण अवतार । बुद्धिगवीय वादा ।
निजदल्ली निजनादा । धन्य धन्य सिद्धबोधा ।।२।।
सिद्धसाधन मडिदा । शिवरूप नोडिदा ।
बहु दोड्डवी वेदा । प्रल्हादन्न प्रबोधा ।।३।।

सिद्धानंदांचा जयजयकार असो. सिद्धपदाला प्राप्त झालेल्या सिद्धानंदांची मी शेजारती करतो. निरंजनरूपाने आपण प्रसिद्ध असून आपला महिमा अगाध आहे. ।।१।।
आपण नारायणाचा (गुरुलिंगजंगमांचा) अवतार असून ज्ञानरूपाने प्रकट झाला आहात. आपण स्वतःमध्येच अनाहतनादरूपाने स्थित झालेले आहात. ज्ञानाच्या पूर्णत्वाला पोहोचलेले आपण धन्य आहात. ।।२।।
सिद्धसाधन करून ज्यांना शिवरूपाचे दर्शन झाले आहे, अशा अत्यंत श्रेष्ठ प्रज्ञारूप सिद्धानंदाकडून प्रल्हादाला ज्ञानाची जागृती प्राप्त झाली आहे. ।।३।।

✻ ✻ ✻

।। श्रीसीतारामचंद्रार्पणमस्तु ।।
।। जय जय रघुवीर समर्थ ।।
।। राजाधिराज श्रीसद्गुरुनाथमहाराज की जय ।।
।। मंगलमूर्ती मोरया ।।
।। पुंडलीक वरदा हरी विठ्ठल ।।
।। श्रीज्ञानदेव तुकाराम ।।
।। पार्वतीपते हर हर महादेव ।।
।। श्रीगुरुदेव दत्त ।।

✻ ✻ ✻

## श्रीगुरुलिंगगीतेची आरती

निंबरगीश्वर जंगम गुरुलिंगप्रभूंनी ।
सिद्धानंदरूपाने गगनी येवोनी ।।

प्रल्हादाचे साठी हृदयी प्रगटोनी ।
तेजोनादे केला बोध तया कर्णी ।।१।।

गुरुलिंगप्रसादगीते गुरुलिंगगीते ।
मामुद्धर मामुद्धर मामुद्धर माते ।।ध्रु।।

जंगमप्रसादगीता श्रीगुरुलिंगगीता ।
बोध अमृताची त्रिवेणी सरिता ।।

ब्रह्मस्वरूपा ती निरतिशय पूता ।
**केशवचित्ती** राहो ज्ञानप्रसन्नता ।।२।।

– डॉ. के. वा. आपटे, सांगली.



## श्रीनिंबरगीकरमहाराजांची आरती

आरती नारायणा । धन्य जगज्जीवना ।।
सगुण ब्रह्ममूर्ती । काय तपोनिधाना ।।ध्रु।।

सद्गुरू काडसिद्ध । तुकाराम अवतार ।।
साधन सांप्रदाय । वाढविला बडिवार ।।१।।

गुरुलिंगजंगम नावे । जगप्रसिद्ध जाहला ।।
**दासराम** शरण येता । अंतरिये बोध केला ।।२।।

– श्रीदासराममहाराज केळकर, सांगली.

## श्रीमामामहाराज केळकर यांची आरती

आरती गोविंदा । नित्य कीर्तनानंदा ।।
सच्चिदानंद-कंदा । गुरुलिंग साधुबोधा ।।ध्रु।।

हनुमंत-सद्गुरु-आज्ञे । केले अखंड कीर्तन ।।
सर्वस्व वेचियेले । समर्पिले पंचप्राण ।।१।।

ब्रह्मचैतन्यादि संत । भाऊराव समर्थ ।।
रामचंद्र नारायण । नाम बोधी हे कथीत ।।२।।

श्रीराम जयराम जयजय राम । तेरा अक्षरे परम ।
संदेश निर्वाणीचा । पायी लोळे **दासराम** ।।३।।

– श्रीदासराममहाराज केळकर, सांगली.

## श्रीदासराममहाराजांची आरती

आरती रामराया । करी कृपेची छाया ।
दावोनी दीनी दया । धन्य धन्य महाराया ।।ध्रु।।

सद्गुरू हनुमंत । पिता गोविंद संत ।
बोधी गुरुलिंग सिद्ध । धरुनि रूप सिद्धानंद ।।१।।

सिद्धसाधनाने । स्वये ब्रह्मचि झाले ।
भावादरे **केशवाने** । चरणी मस्तक ठेविले ।।२।।

– प्रा. डॉ. के. वा. आपटे, सांगली.

## ।। श्रीगुरुलिंगजंगम प्रसन्न ।।

जय जय जय गुरुलिंगा । सत्‌चित् सुखकंदा ।।
तव पदी शरण येता । हरसी भवबंधा ।।ध्रु।।

जगद्रूपी तू असती । असती निजयोगी ।।
वसतीस्थान तुमचे । धाम निंबरगी ।।१।।

ब्रह्मनिद्रेमाजी । माजी तू रमसी ।।
परमार्थाची किल्ली । निजभक्ता देसी ।।२।।

तव पदी युगुल रजाचा । लागत मधुवारा ।
माया भव निवारुनी । देसी सुख सारा ।।३।।

नारायण गुरुचरणी । शरण अनन्य ।।
प्रेमे आरती करिता । **रघुनाथची** धन्य ।।४।।

– प. पू. श्रीदादामहाराज कोटणीस, सांगली.

✻ ✻ ✻



## ।। श्रीगुरुलिंग - नमनम् ।।

गुरुलिंगं महाराजं मोक्षसाधनदेशिकम् ।
गुरुं नारायणं पूज्यं नमामि करुणार्णवम् ।।१।।

जंगमेशं महानाथं जगदुद्धारकारकम् ।
शिवरूपं सदानन्दं नमामि नतमस्तकः ।।२।।

नारायणस्य चरणौ हृदि चिन्तयामि
नारायणस्य चरणौ हृदि पूजयामि ।
नारायणस्य चरणौ हृदि संस्मरामि
नारायणस्य चरणौ शरणं प्रपद्ये ।।३।।

शृणोमि नारायण–नाम–मंगलं
स्मरामि नारायण–नाम–गौरवम् ।
वदामि नारायण–नाम–पुण्यदं
नमामि नारायण–पाद–पुष्करम् ।।४।।

गुरुलिंगं गुरुं नौमि शांतं दान्तं क्षमा–युतम् ।
संतुष्ट–मानसं स्तुत्यं गुरुराजं निरंजनम् ।।५।।

सदाचारेण संयुक्तं मायातीतं महेश्वरम् ।
वन्देऽहं निरहंकारं धैर्ययुक्तं जितेन्द्रियम् ।।६।।

वीत–भीति–मदं स्तौमि लोभातीतं विमत्सरम् ।
वीतरागं महोत्साहं भजे दम्भ–विवर्जितम् ।।७।।

नारायणाय गुरवे सच्चिदानन्द–रूपिणे ।
गुरुलिंगाय देवाय वारं वारं नमो नमः।।८।।

।। इति केशवरचितं श्रीगुरुलिंग–नमनं सम्पूर्णम् ।।

✻ ✻ ✻

## सूची


| पद क्र. | पदाची सुरुवात | पृष्ठ क्र. |
|---|---|---|
| ५ | ॐ नमो भगवते | ४ |
| २३ | ॐ रामेश्वरसुरने ॐ | १७ |
| २ | ॐ नमो श्रीजगदाधारनु | १ |
| ३३ | आ ब्रह्म नादव | २३ |
| ५३ | आरती नारायणा | ३७ |
| ५१ | आरती शंकर सांबा | ३५ |
| ४७ | इंद्रियनिग्रह चलो बुद्धीयू | ३२ |
| १७ | कण्णिरेनो महाकारणनात्मन् | १३ |
| ३६ | कायो ई विषयन्न | २५ |
| ४९ | को जाग्रति कोजागिरि | ३४ |
| ४१ | क्लेश हरिसो यन्न | २८ |
| १४ | गुरुलिंग गुरुलिंग गुरुलिंग | १० |
| २२ | गुरुलिंग जय गुरु | १६ |
| ३५ | गुरुलिंगने कोट्टरेनू पुण्य | २४ |
| १२ | गुरुलिंगजंगम गुरु कृपानिधे | ९ |
| २८ | गुरुलिंगजंगम पूजेय माडिद | २० |
| ३८ | गुरुलिंगजंगमा नी दया | २६ |
| ४४ | चिंता मनिगे ब्याडी | ३० |
| २१ | छलो ई भालदल्ली | १५ |
| ४२ | जड गुण गळ | २९ |
| ५२ | जय जय जय | ३६ |
| ६ | जय जय वंदई | ५ |
| ५४ | जय जया जय | ३७ |
| ५५ | जय जया सिद्धानंदा | ३८ |
| ४ | जय हर शंभो सांब | ३ |
| ४० | दया माड बेको | २८ |
| १९ | दिन्ना परमात्मन प्रभु | १४ |
| ९ | दोड्डु जन्मद व्ययनू | ६ |
| ४६ | दोड्डु प्रपंचदोळू सुखविल्ल | ३१ |
| ४३ | नन्न यल्लार्पितु देवा | २९ |
| ४८ | नमो नमोजी सिद्धरभक्तगे | ३३ |
| १ | नमो वरव कोडुवाता | १ |
| २६ | नादन केडुत निद्रिय | १९ |
| ३४ | ना नी नी | २४ |
| ८ | ना नीने गुरुराया | ६ |
| १० | नारायण नारायण नारायण | ७ |
| १३ | नारायण श्रीहरी स्वामिन् | ९ |
| २५ | निन्न ई सेवा | १८ |
| २९ | निन्नविग येनू रथारूढेल्ला | २० |
| २७ | निंबरगीवाशा नीने पालिसो | १९ |
| ३० | निंद नुडिय वस्तू | २१ |
| ३७ | न्याय माडो नी | २५ |
| ७ | प्रभु स्वामी प्रभु | ५ |
| ११ | प्राणप्रिय परमेश्वरांबुजपद पूज | ८ |
| ३२ | मुप्पीनमुनीय गुरु बोधसुधे | २२ |
| ३९ | यज्जीवने मती कोडो | २७ |
| ३१ | यण्णद कण्णद सण्णद | २२ |
| २४ | यन्न प्राणवेंबुवे आरति | १७ |
| ४५ | यल्ल जीवद नाकू | ३१ |
| ५० | रेवण मरुळ श्रीकाडसिद्ध | ३५ |
| १६ | श्रीगुरुलिंगा श्रीभीमाण्णा | १२ |
| २० | षडचक्रावरिगे श्रीरामा | १५ |
| १५ | सद्गुरु सिद्धानंद | १२ |
| १८ | सहजासन हाकी कोळ्ळीरिसी | १३ |
| ३ | संगमेश्वरन्न रामा पूजे | २ |


००००

# श्रीदासराममहाराजांची ग्रंथसंपदा

१) मनोहर विनायक मंगळवेढेकर यांचे ओवीबद्ध चरित्र................१९४०

२) श्रीज्ञानदेवतेहत्तिशी,सानंद टीकेसह,व तात्पर्यार्थसह श्रीज्ञानेश्वरमहाराजांचा हरिपाठ...१९५२

३) श्रीज्ञानदेवमुद्राप्रकाश साधनमुद्रा टीकेसह, आणि ज्ञानेश्वरीसार........१९६८

४) वायुलहरी, आणि ज्ञानदेव आज्ञापत्र (ओवीबद्ध भावार्थ)............१९६९

५) ज्ञानेश्वरकृत दत्तस्तुति, श्रीदत्तस्तुतिप्रसाद ओवीबद्ध टीकेसह.........१९७१

६) श्रीज्ञानेश्वरकृत नमनस्तोत्र, भावार्थ नमनासह.........................१९७२

७) श्रीनारायणरावजीमहाराज यरगट्टीकर चरितामृत........................१९७३

८) श्रीनागाप्पाण्णामहाराज निंबरगीकर चरित्र.................(सन दिलेला नाही)

९) श्रीज्ञानेश्वरी चिंतनस्तोत्र व ज्ञानेश्वरी संकीर्तन स्तोत्र (भावार्थासह)....१९७४

१०) श्रीज्ञानेश्वरस्तोत्र....................................................१९७५

११) सिद्धस्तुती........................................................१९७७

१२) अमृतानुभव - मंगलाचरण, मंगलप्रसाद टीकेसह.....................१९७९

१३) तात्यासाहेब कोटणीसमहाराज चरित्र.................................१९८३

१४) श्रीसंत राधाबाई अक्का यांचे चरित्र............................... (सन नाही)

१५) गुरुपाठ...........................................................१९८४

१६) सांप्रदायबोध...................................................... १९८४

१७) श्रीरामपाठामृत......................................................१९८४

१८) बाबासाहेब मजमदार यांचे चरित्र....................................१९८४

श्रीदासराममहाराजांची ग्रंथसंपदा

२१) संजीवनपाठ.......................................................१९८७

२२) श्रीदासरामवचनामृत...............................................१९८७

२३) नासदीयसूक्त, भावार्थ संगति......................................१९८८

२४) श्रीगोविंददर्शन....................................................१९८८

२५) सांगली माहात्म्य ऊर्फ श्रीगंगाधरपंत चरितामृत.....................१९८८

२६) श्रीदासरामगाथा..................................................१९८८

२७) श्रीतुकाराममहाराज नित्यपाठ, भावार्थ विवरण......................१९८९

२८) श्रीगुरुमहिमा......................................................१९९१

२९) श्रीज्ञानेश्वरस्तोत्र व अन्य लघुग्रंथ..................................१९९७

३०) श्रीरामदासबोध....................................................१९९७

३१) श्रीचांगदेवपासष्टी, एक नाम कला.................................१९९९

३२) परमार्थासार आणि अन्य ग्रंथ (उद्धवरावजी महाराज यरगट्टीकरांच्या चरित्रासह)....२००२

३३) परमार्थ प्रश्नोत्तरी, आवृत्ती पाहिली व दुसरी........................२००२

३४) आरती संग्रह.....................................................२००२

३५) चांगदेव पासष्टी व इतर ग्रंथ.......................................२००२

३६) हरिपाठ संकीर्तन...................................................२००७

३७)श्रीदासराममहाराज : श्लोकरचना....................................२०१०

३८)अनभवामत सम-ओवी-टीकेसह...................................२०१०